# अमृत कुंभ



वर्ष ७ । अंक २ । जून - जुले १३ । मूल्य रु. १०/-



# राजयोगिनी दीदी मनमोहिनी

३० वी पुण्यतिथी (२८ जुलै २०१३)

दीदीजींचे अनमोल महावाक्य -

सदैव लक्षात ठेवा की आता आपल्या घरी परमधाममध्ये जायचे आहे.
म्हणजे सहजच आपला बुध्दियोग शिवबाबांशी राहिल.
आपला संसार, आपला परिवार व आपले सर्वस्व एक शिवबाबाच आहे.
त्यामुळे आपले सर्व संबंध त्यांच्याशीच जोडा.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

[redacted]

# अमृत कुंभ

[redacted]

## मुखपृष्ठाविषयी

परमपिता 'शिव' परमात्मा निराकार ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. परंतु तो सर्व गुणांचा सिंधु अर्थात सागर आहे. म्हणून त्याची महिमा शांतीचा सागर, सुखाचा सागर, आनंदाचा सागर, प्रेमाचा सागर अशी केली जाते. संगम-युगात जे आत्मे, परमात्म्याशी योगयुक्त राहून, त्याच्याशी कम्बाइण्ड (एकत्रित) स्थितीचा (शिवशक्ती स्वरूपाचा) अनुभव करतात, साहजिकच ते देखील मास्टर सर्व गुणांचे सागर बनतात. मातेश्वरी मम्मा या सहजयोगी, कर्मयोगी आणि निरंतर योगी असल्याने, त्यांच्या जीवनात सर्व ईश्वरी गुण व सर्व शक्तींची तसेच संपूर्ण ईश्वरी ज्ञानाची अनुभूती होत असे. त्यांचा प्रत्येक संकल्प, बोल व कर्म दिव्यतेने परिपूर्ण होते. जसा परमात्मा सर्व आत्म्यांचा पिता आहे तशा मातेश्वरी साऱ्या जगताच्या माता होत्या. म्हणूनच त्यांना जगदंबा असेही म्हटले जाते. हाच बेहदचा भाव मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्यात आला आहे.

मम्मांनी यज्ञमाता बनून जगदंबा मातेचे कर्तव्य केले. सर्व यज्ञवत्सांची मातृवत पालना केली. त्याचबरोबर त्यांनी आपल्या अलौकिक जीवनात अतिशय तीव्र पुरुषार्थ करून, दिनांक २४ जून १९६५ रोजी संपूर्ण स्थिती प्राप्त केली आणि त्या अव्यक्त वतनवासी बनल्या. त्यांच्या ४८व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम !

-- *प्रकाशक, अमृतकुंभ.*

**वार्षिक वर्गणी रु. ६०/-**
**अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-**
**आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

## अंतरंग


। आदिदेवी जगदंबा सरस्वती (संपादकीय) २
। माता जगदंबा यांच्या अनमोल शिकवणी ५
। खुशी कमी होण्याची कारणे व त्यांचे निवारण ६
। संतुष्टता हीच आत्म्याची खरी संपत्ती ९
। प्रत्यक्षता आणि पश्चात्ताप १३
। 'प्रजापिता ब्रह्मा - एक अद्‌भूत जीवन रहस्य' हे जगातील सर्वात मोठे पुस्तक व आध्यात्मिक मेळाव्याचे सचित्र सेवावृत्त १७
। राजयोगाद्वारे तणावमुक्त जीवन २१
। योगिनी मातेश्वरी (कविता) २४
। वर्णमालेत गवसले जीवनमर्म २५
। दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसति २९
। ब्राह्मण जीवनाची वैशिष्ट्ये ३१
। सचित्र सेवावृत्त ३३



**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail : meenakshi.bk@gmail.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के. गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ ीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

संपादकीय...

# आदिदेवी जगदंबा सरस्वती

जगदंबा व अन्य शिवशक्तींनी, परमात्मा शिव पित्याच्या आदेशानुसार कलियुगी पतित दुनियेचा त्याग करून, मनुष्य आत्म्यांना भविष्य २१ जन्मांसाठी जीवनमुक्त देवपदाची प्राप्ती करविण्याचे महान कर्तव्य केले. म्हणूनच जशी परमात्म अवतरणाच्या स्मृतीप्रित्यर्थ महाशिवरात्री साजरी केली जाते तशीच शिवशक्तींच्या या महान कर्तव्याचे प्रतीक म्हणून नवरात्री उत्सव वर्षातून दोन वेळा मोठ्या उत्साहाने भारतभर साजरा केला जातो. जगदंबा मातेकडे भक्त धन, आयु, भाग्य, संतती इत्यादी गोष्टी मागतात. परंतु ही प्राप्ती केवळ त्यांच्या जड मूर्तीचे गायन-पूजन करून होत नाही तर संगमयुगात त्यांनी दिलेले ईश्वरी ज्ञान धारण केल्याने होते. म्हणूनच म्हटले जाते, 'ईश्वरी ज्ञाना-वाचून गती नाही.' **मुख्य म्हणजे ज्ञानसागर शिव परमात्म्याने दिलेले ज्ञान आपल्या बुद्धिरूपी कलशात धारण करून, अन्य आत्म्यांना प्रदान करण्याची अलौकिक ईश्वरी सेवा 'आदि' काळात जगदंबा (जगत्जननी) यांनी केली. म्हणूनच त्यांना आदिदेवी असेही म्हटले जाते.** अशा आदिदेवी जगदंबा सरस्वतींचा जीवनपट आपण थोडक्यात पाहू या.

मम्मांचा जन्म अमृतसर येथे एका सिंधी कुटुंबात सन १९१९ मध्ये झाला. त्यांचे बालपणीचे नाव राधा होते. त्या अतिशय मधुर स्वभावी, हुशार व कुशाग्र बुद्धीच्या होत्या. त्यांचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण हैदराबाद (सिंध) मध्ये झाले. त्यानंतर वयाच्या १७व्या वर्षी म्हणजे सन १९३६ मध्ये जेव्हा पिताश्री ब्रह्माबाबांनी आपल्या घरी 'ओम् मंडली' या सत्संगाची सुरुवात केली तेव्हा त्या आपल्या आईबरोबरच सत्संगात आल्या होत्या. पिताश्री ब्रह्माबाबांनी जेव्हा मम्मांना ईश्वरी ज्ञान समजावून सांगितले तेव्हा त्यांना ते अतिशय आवडले व त्याचवेळी त्यांनी ईश्वरी सेवेसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पण करण्याचा दृढ संकल्प केला. राधे ही सत्संगात ॐचा ध्वनी अतिशय चांगल्या प्रकारे करीत असे. म्हणून पुढे तिला सर्वजण 'ॐ राधे' असे म्हणू लागले. पवित्रतेची साक्षात मूर्ती ॐ राधेचे जीवन त्याग, तपस्या व सेवेने परिपूर्ण होते. पुढे ब्रह्माबाबांनी जेव्हा ईश्वरी ज्ञान-यज्ञाची स्थापना केली तेव्हा यज्ञमातेची सर्वात मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. त्यामुळे सर्वजण ॐ राधेला, मातेश्वरी मम्मा असे संबोधू लागले.

यज्ञात सुरुवातीला सुमारे ३५० कन्या व मातांचा समावेश होता. त्या सर्व यज्ञवत्सांना मम्मांनी मातृवत स्नेह दिला व सर्वांची आध्यात्मिक उन्नती घडवून आणली. त्यांच्या वाणीत कमालीचा गोडवा होता. त्यांचा प्रत्येक संकल्प, बोल व कर्म श्रीमतानुसार होते. मम्मांनी आपल्या २९ वर्षाच्या अलौकिक जीवनात (सन १९३६ ते १९६५) अतिशय तीव्र पुरुषार्थ केला आणि आपली संपूर्ण कर्मातीत अवस्था प्राप्त केली. त्यामुळे मम्मांचे जीवन प्रत्येक ब्रह्मावत्साकरिता अनुकरणीय आहे. मम्मांच्या पुरुषार्थातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्या रोज सकाळी २ वाजता उठून एकातांत बसून, शिवबाबांची मोठ्या प्रेमाने आठवण करीत तसेच त्या निरंतर योगी होत्या. **या योगबलाच्या आधारेच त्या शक्तिस्वरूपा बनल्या होत्या. फलस्वरूप त्यांच्याद्वारे अनेकांना वैष्णो देवी, जगदंबा, सरस्वती, शीतला, काली, दुर्गा इत्यादी देवींचा साक्षात्कार होत असे.** त्यामुळे मम्मांचे जीवनचरित्र अनेक अद्‌भूत व मनमोहक प्रसंगांनी भरलेले आहे. त्यातील काही प्रसंग आपण थोडक्यात पाहू या.

### ❒ स्नेहमयी शक्तिस्वरूपा मम्मा

मम्मा साक्षात शिवशक्तिस्वरूपा होत्या. त्या अनुषंगाने गाजियाबादच्या ब्र.कु.सुतीष बहेन यांचा अनुभव अतिशय हृदयस्पर्शी आहे. सुतीष बहेनचे आई-वडील वैष्णो देवीचे भक्त होते. त्यामुळे बालपणीच त्यांच्याही मनात वैष्णो देवीविषयी श्रद्धा उत्पन्न झाली. त्या नेहमी विचार करीत की 'मला सुद्धा अशी देवी बनायचे आहे परंतु कसे बनता येईल हे मात्र त्यांना समजत नव्हते.' पुढे एकदा त्यांना स्वप्नात देवी मातेचा साक्षात्कार झाला. त्यावेळी त्यांनी पाहिले की सुंदर मोठी रुम आहे. सर्वत्र लाल प्रकाश पसरला आहे. तेथे एक सफेद गादी आहे, शेजारी एक

सफेद खुर्ची आहे, जिच्यावर सफेद वस्त्र परिधान करून देवी माता (मम्मा) बसल्या आहेत. सुतीष बहेन मोठ्या आनंदाने मम्मांच्या जवळ गेल्या. मम्मांनी स्नेहयुक्त दृष्टी दिली व त्यांना विचारले की तू येथे राहशील का? मम्मांचे हे बोल ऐकून सुतीष बहेनचे डोळे भरून आले व त्या मम्मांकडे एकटक पहात राहिल्या. थोड्या वेळानंतर मम्मांनी त्यांचा हात आपल्या हातात घेतला व म्हणाल्या, 'मुली, तू लवकरच येथे येशील.' साक्षात्काराचे हे दृश्य सुतीष बहेनच्या हृदयात कोरले गेले व त्या सारखे त्याविषयी विचार करू लागल्या. त्यानंतर सुमारे सहा वर्षाचा काळ लोटला.

सुतीष बहेन दिल्लीत रहात असताना, जेव्हा त्या आठवीत शिकत होत्या तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत त्या सकाळच्या वेळी यमुनेच्या काठी फिरायला गेल्या होत्या. तेथे त्यांनी दोन सफेद वस्त्रधारी बहिणी लोकांना ज्ञान समजावून सांगताना पाहिले. सुतीष बहेन लगेचच त्यांच्यासमोर बसून लक्षपूर्वक ज्ञान ऐकू लागल्या. तेव्हा त्यांनी कल्पवृक्षाचे चित्र पाहिले ज्यात मम्मांना तपस्या करतांना दाखवले आहे. तेच चित्र सुतीष बहेनने साक्षात्कारात पाहिले होते. त्यामुळे त्यांना अतिशय आनंद झाला. लगेचच त्यांनी ब्रह्माकुमारींना विचारले की चित्रातील या मातांना आपण जाणता का? तेव्हा त्यांनी उत्तर दिले की या तर आमच्या यज्ञमाता आहेत. सुतीष बहेनच्या मनात ही खात्री पटली की आपल्याला साक्षात्कारात दिसलेल्या देवी माता (मम्मा) लवकर भेटतील. पुढे सन १९५४ मध्ये जेव्हा दिल्लीतील कमलानगर सेवाकेंद्रावर मम्मा येणार होत्या. तेव्हा सुतीष बहेन मम्मांचे स्वागत करण्यासाठी हातात फुलांचा हार घेऊन रांगेत उभ्या होत्या. मम्मा गाडीतून उतरल्यावर त्यांनी धावत जाऊन मम्मांच्या गळ्यात हार घातला. **त्यावेळी आश्चर्याची गोष्ट म्हणजे मम्मांनी सुतीष बहेनचे नाव घेऊन विचारले की, सुतीष तू कशी आहेस? तुला जे हवे होते, ते मिळाले ना! मम्मांचे हे स्नेहमयी बोल व शक्तिशाली दृष्टी मिळताच सुतीष बहेनच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. कारण लहानपणी देवी मातेच्या रूपाने स्वप्नात दर्शन देणारी मम्मा, आज प्रत्यक्ष त्यांच्या-समोर होती.** या प्रसंगावरून हे स्पष्ट होते की मम्मा प्रत्येक आत्म्याचा पार्ट जाणत होत्या. तसेच प्रत्येक आत्म्याची आध्यात्मिक पालना करीत होत्या. म्हणूनच त्यांची महिमा जगदंबा सरस्वती अशी केली जाते.

### ❒ मम्मांच्या द्वारे देवींच्या साक्षात स्वरूपाचा अनुभव

मम्मा एकदा बटाला (पंजाब) येथे गेल्या होत्या. तेव्हा तेथील ब्र.कु.नंदकिशोर भाईंनी मम्मांना पहिल्यांदाच पाहिले. पहिल्या दिवशी मम्मांनी सार्वजनिक सभेला संबोधित केले व दुसऱ्या दिवशी त्या ब्राह्मण परिवाराला भेटल्या त्यावेळी मम्मा अतिशय शांत मुद्रेत बसल्या होत्या. मम्मांची दृष्टी जेव्हा प्रथम नंदकिशोर भाईंवर पडली तेव्हा त्यांना अनुभव आला की हीच आपली आई आहे. नंतर ते जसे मम्मांच्या सान्निध्यात गेले तेव्हा त्यांना आईच्या कुशीत मिळणारे खरे सुख अनुभवाला आले. **मम्मांच्या कुशीत जणू फुलं आच्छादित केली आहेत असे वाटले. मम्मांना जेव्हा त्यांनी बाह्य स्वरूपात पाहिले तेव्हा त्यांना वैष्णो देवीचा अनुभव आला व कुशीत विसावल्यावर शीतला देवीचा अनुभव आला. अशाप्रकारे त्यांनी मम्मांमध्ये देवींच्या साक्षात स्वरूपाचा अनुभव केला.**

### ❒ मम्मा साक्षात सरस्वती

मम्मा साक्षात सरस्वती अर्थात ज्ञानस्वरूप होत्या. मम्मा ज्ञानाचे विवेचन अशाप्रकारे करीत की ऐकणाऱ्यांना वाटे की साक्षात सरस्वती देवी बोलत आहे. एकदा सिकंदराबाद मधील काही लोक ज्ञानाला खूप विरोध करू लागले. त्यामुळे पिताश्री ब्रह्मांबाबांनी मम्मांना तेथे जायला सांगितले. बाबांच्या आदेशानुसार मम्मा तेथे गेल्या. त्या विरोधकांना भेटल्या व आपल्या मधुर, सारगर्भित वाणीने सर्वांची मने जिंकली. परिणामतः विरोधकांना असे वाटले की साक्षात सरस्वती येथे प्रकट झाली आहे. माता सरस्वतीचे हे रूप पाहून ते म्हणाले, 'माते, आम्हाला क्षमा कर. आम्हाला आपला परिचय नव्हता. आपल्या मुखकमलाद्वारे आम्ही ज्ञानाचे जे विवेचन ऐकले, ते खरोखर अद्‌भूत आहे. चिंतन योग्य आहे. आम्ही या ज्ञानाची धारणा करू अथवा न करू परंतु आपल्या आगमनामुळे आमचे मनःचक्षु उघडले आहेत.' अशातऱ्हेने विरोधकांच्या मनात ईश्वरी ज्ञानाविषयी तसेच परमात्म्याचे माध्यम पिताश्री ब्रह्माबाबां-

विषयी श्रद्धा उत्पन्न झाली होती.

### ❒ मम्मा साक्षात अष्टभुजाधारी दुर्गा

मम्मा एकदा श्रीहरगोविंदपूर येथे आल्या होत्या कारण तेथून एकाच वेळी १६ कन्या ज्ञानात चालत होत्या. त्यांच्यात उमंग-उत्साह व शक्ती भरण्याकरिता मम्मांचे आगमन झाले होते. त्या कन्यांमध्ये सोनीपत सेवाकेंद्राच्या जनक बहेन यांचाही समावेश होता. त्या काहीशा आजारी असत. त्यामुळे त्यांनी मम्मांना विचारले की 'मी तर बऱ्याच वेळा आजारी असते. मग मी कशी काय सेवा करू शकेन?' **हे ऐकल्यावर मम्मा म्हणाल्या, 'तू तर शक्तिस्वरूप आत्मा आहेस. असे कमजोर संकल्प तू कधीच करू नकोस. तुझा साथी स्वयं भगवान आहे. हे कधीच विसरू नकोस.' मम्मांचे हे वरदानी बोल ऐकताच जनक बहेनच्या अंतरंगात शक्तीची लहर पसरली व आपण आजारी आहोत, हे देखील त्या विसरून गेल्या.** एवढंच नव्हे तर पुढील ४० वर्षांच्या सेवेच्या कालावधीत कधी चुकूनही त्यांच्या मनात कमजोरीचा संकल्प उत्पन्न झाला नाही.

दुर्गास्वरूप मम्मांना जेव्हा त्यांनी पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्या एकटक पहातच राहिल्या. त्यावेळी मम्मांनी विचारले, 'मुली, तू काय पहात आहेस?' तेव्हा जनक बहेन म्हणाल्या की मी जेव्हा तुम्हाला पहिल्यांदा पाहिले तेव्हा तुम्ही वाघावर आरुढ अष्टभुजाधारी दुर्गा आहात असे मला दिसले. परंतु आता साधारण रूपात दिसत आहात. हे काय आहे? ही काय जादू आहे? तुम्ही इतक्या लवकर वस्त्र कसे बदलले? तेव्हा मम्मांनी जनक बहेनच्या डोक्यावरून मोठ्या प्रेमाने हात फिरवला व म्हणाल्या, 'ही तुझी भावना आहे. तुला दुर्गा माता फार आवडते ना! म्हणून तुला दुर्गा मातेचा साक्षात्कार झाला.' त्यावेळी जनक बहेनला पूर्ण विश्वास झाला की मम्मा याच दुर्गामाता आहेत, जिला आपण फार पूजले आहे. अशारीतीने मम्मा शक्तिस्वरूपा व स्नेहाची मूर्ती होत्या. इतकच नव्हे तर सर्वांच्या हृदयेश्वरी होत्या.

### ❒ मम्मा प्रेरणामूर्त होत्या

मम्मांचे व्यक्तिमत्व इतके आकर्षक होते की त्यांना एकदा पाहिल्यावर सुद्धा त्यांच्यासारखं बनायची प्रेरणा अनेकांच्या मनात उत्पन्न होत असे. त्यांच्या चेहऱ्यावर ईश्वरी नशा व योगबल स्पष्ट दिसत असे. त्यांच्या सभोवती पसरलेले दिव्यतेचे प्रभामंडल सर्वांना आकर्षित करीत असे. सन १९६४ मध्ये पहिल्यांदाच मम्मा अंबाला येथे आल्या होत्या. त्यावेळी मानसा (पंजाब) च्या सुदेश बहेन केवळ १२ वर्षाच्या होत्या. त्या आपल्या आईबरोबर मम्मांच्या क्लासला गेल्या होत्या. मातेश्वरींना जेव्हा सुदेश बहेनने पाहिले तेव्हा त्यांचे मन तेथून घरी परत जायलाच तयार नव्हते. परंतु त्या वयाने लहान असल्यामुळे त्यांना घरी जावे लागले. मम्मांना पाहून त्यांना ही प्रेरणा प्राप्त झाली की मला पुढे मम्मांसारखेच बनायचे आहे. त्यांना नंतर पुन्हा मम्मांना भेटण्याची संधी मिळाली नाही. परंतु मम्मांना केवळ एकदा पाहून त्यांनी अलौकिक जीवन जगण्याचा दृढ संकल्प केला व आजही त्या ज्ञानमार्गात उन्नती करीत आहेत.

### ❒ मम्मा सर्वांची मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू

मम्मा सर्व ब्रह्मावत्सांच्या मनोकामना पूर्ण करीत असत. सन १९६० मध्ये मम्मा कानपूर येथे आल्या होत्या. तेथून १०० कि.मी. अंतरावर 'सीहमऊ' येथे एक गीता पाठशाळा नुकतीच सुरू झाली होती. तेथील ब्रह्मावत्सांनी मम्मांना मोठ्या प्रेमाने निमंत्रण दिले. त्यानुसार कानपूरहून संध्याकाळी मम्मा बसने निघाल्या. परंतु कच्चा रस्ता असल्यामुळे तसेच नदीला पूर आल्याने सीहमऊ येथे पोचायला सकाळ झाली. मम्मांची प्रतिक्षा करत ब्रह्मावत्सांनी रात्रभर योगभट्टी केली तसेच मम्मा सुद्धा रात्रभर बसमध्ये बसून, ब्रह्मावत्सांना शक्ती देत होत्या.

सकाळी मम्मा जेव्हा गीतापाठशाळेत गेल्या. तेव्हा त्यांनी तेथील सर्व परिस्थिती पाहिली. ती पाहून त्यांनी पुढील कार्यभार आपल्या हाती घेतला. त्यांनी दुकानातून तांदूळ मागवले. ते साफ केले. गव्हाचे पीठ मागवून आपल्या हाताने पोळ्या केल्या. दुपारपर्यंत सर्वांसाठी ब्रह्माभोजन तयार केले. एवढच नव्हे तर प्रत्येक ब्रह्मावत्साला आपल्या हाताने एक-एक घास मोठ्या प्रेमाने भरवला. नंतर संध्याकाळी एका ठाकूरच्या हवेलीत सर्व ग्रामस्थांना बोलवून, ईश्वरी ज्ञान दिले. तेथे टेबल, खुर्ची नसल्यामुळे सुमारे दोन तास त्यांनी उभे राहूनच प्रवचन केले. मम्मांचे प्रवचन

ऐकून सर्वांच्या मनातील शंका दूर झाल्या कारण मम्मांची वाणी अतिशय स्पष्ट व शक्तिशाली होती. तात्पर्य म्हणजे ईश्वरी सेवेसाठी मम्मा सदैव तत्पर असत. त्या कधीच हा विचार करीत नसत की हे तर गाव आहे, येथील लोक अशिक्षित आहेत, तेथे जाणे मोठे त्रासदायक आहे. सर्व आत्म्यांचे कल्याण करण्याची भावना सदैव त्यांच्या मनात असे. म्हणूनच त्यांना सर्वांची मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू असे म्हटले जाते.

अशाप्रकारची बेहद विश्वकल्याणाची भावना आपल्याही मनात सदैव रहावी, यासाठी आवश्यक आहे, माता जगदंबा यांचे अनुकरण करण्याची, त्यांच्यासारखे स्वतःला जगत्माता (वा जगत्पिता) समजण्याची. जशी मुलाच्या कल्याणाची भावना मातेच्या हृदयी सदैव असते तशी मातृवत भावना सर्वांविषयी मनात जोपासण्याची.

**अशा सर्व ज्ञानरत्नांनी संपन्न सरस्वती स्वरूपा, सर्व गुणसंपन्न श्रीलक्ष्मी स्वरूपा, सर्व शक्तीसंपन्न अष्टभुजाधारी दुर्गा स्वरूपा, त्याग-तपस्या-सेवा मूर्त, सदा स्नेहमयी, शिवशक्ती स्वरूपा मम्मांचे जीवन म्हणजे जणू संगमयुगात चैतन्य स्वरूपात नवदुर्गाचे या सृष्टीवरील अवतार कार्य होते. मम्मा दि. २४ जून १९६५ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून अव्यक्त वतनवासी बनल्या तसेच ॲडव्हान्स पार्टीच्या सेनानी, बेहद विश्वसेवाधारी बनल्या. त्यांच्या ४८ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीला विश्वभरातील सर्व ब्रह्मावत्सांची कोटी-कोटी भावसुमनांची श्रद्धांजली !** ❖❖❖

## माता जगदंबा यांच्या अनमोल शिकवणी

● शिवबाबा या विश्वाचा मालक आहे. तो आपले काम अवश्य करेल. परंतु आपल्या मनात असले पाहिजे की मला विकारांचा विनाश व श्रेष्ठ गुणांची स्थापना करायची आहे.

● झालेल्या वाईट गोष्टींची पुन्हा-पुन्हा आठवण केल्याने खुशी नाहिशी होते म्हणून त्या गोष्टी विसरून जा आणि नवीन श्रेष्ठ कर्माचे खाते जमा करा.

● घर-गृहस्थीमध्ये रहातांना स्वतःला विश्वस्त (ट्रस्टी) समजा म्हणजे प्रत्येक कर्म श्रेष्ठ होईल.

● आजारपणात कधीही घाबरून जाऊ नका. कर्मयोगा-द्वारे कर्मभोगावर विजय प्राप्त करा.

● **ज्ञानी आत्म्याच्या सोबत सदैव दोन गुण असतील. तो लहानांना स्नेह आणि मोठ्यांना सन्मान अवश्य देईल.**

● स्वतःला निमित्त समजून ईश्वरी सेवा करा. परंतु 'शो' (दिखावा) करू नका. सदैव लक्षात ठेवा की मी शिवबाबांच्या कार्यात मदतगार आहे आणि माझे स्वतःचे भाग्य बनवित आहे.

● कोणतेही कर्म विकारयुक्त नसावे. कोणतेही वचन कटु नसावे. आपला व्यवहार सदैव मधुर असावा.

● सदैव हर्षितमुख राहा. मन प्रसन्न ठेवा. बुद्धी स्वच्छ ठेवा म्हणजे स्वभाव-संस्कार सरळ राहतील.

● रोज रात्री झोपण्यापूर्वी आपल्या कर्माचा हिशोब तपासून पाहा. अशी कोणतीही चूक करू नका की ज्यामुळे शेवटी धर्मराजाची शिक्षा भोगावी लागेल. आपल्या मन-वचन-कर्मावर सदैव लक्ष द्या.

## दैवी भ्राता दिनकर भाईंना भावपूर्ण श्रद्धांजली!

**जैसे फुलो में सुगंध होती है, फलो में होती है मिठास।**
**हिरनी में छिपी होती कस्तुरी, वैसे आप में था ज्ञानप्रकाश।।**

परमप्रिय शिवबाबांनी आपल्याद्वारे सुरू केलेले 'अमृतकुंभ' द्वैमासिक आजही अनेकानेक मनुष्य आत्म्यांची, ज्ञान अमृताची तहान भागवून, त्यांची आत्मिक उन्नती करीत आहे. तशी पुढेही ज्ञानसागर शिवबाबा त्याद्वारे करवतील.

**दिनांक २८ जुलै २०१३ रोजी असलेल्या आपल्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त सर्व ब्राह्मण परिवारातर्फे, आपल्या पावन स्मृतीला कोटी-कोटी श्रद्धा सुमन समर्पित!** -- *ब्र.कु. गोदावरी, प्रकाशक-अमृतकुंभ.*

# खुशी कमी होण्याची कारणे व त्यांचे निवारण

***ब्र.कु.भगवानभाई, शांतीवन (आबू रोड).***

वर्तमानसमयी शिवबाबा ब्रह्मावत्सांना सदा खुश राहण्याचा इशारा देत आहेत. कारण जो सदा खुश राहतो तोच इतरांना शांती, शक्ती, आनंद व सुखाचा अनुभव करवू शकतो. आजपर्यंत आपण परमात्म्याचा परिचय देण्यासाठी राजयोग प्रदर्शनातील चित्रांचा, प्रोजेक्टर शोचा, प्रवचनाचा, आध्यात्मिक मेळे, संमेलन इत्यादी साधनांचा वापर केला. परंतु आता आपल्याला परमात्म प्रत्यक्षतेची सेवा करायची आहे. त्यासाठी आपला चेहरा सदा खुश असणे आवश्यक आहे. आपले जीवन सदा खुशीने भरपूर असले पाहिजे. **आजवर आपण ज्ञान व योगाची परमात्म पालना घेतली. अनेकानेक ईश्वरी वरदान व शक्ती धारण केल्या. ईश्वरी सेवेद्वारे अनेकांचे आशीर्वाद प्राप्त केले. अलौकिक ब्राह्मण जीवनात पवित्रतेची पालना केली. विशेष म्हणजे ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले. फलस्वरूप आपला चेहरा हा सदा खुश असला पाहिजे.** परंतु जर आपली खुशी अधूनमधून कमी होत असेल तर नक्की आपल्या धारणेत अथवा पुरुषार्थात काही ना काही कमतरता आहे, असे समजायला हरकत नाही.

जर आपला चेहरा नेहमी खुश असेल तर लोक स्वतःहून आपल्याला विचारतील की तुम्हाला काय प्राप्त झाले आहे ज्यामुळे तुम्ही इतके खुश असता? ते आपल्या चेहऱ्यावरील खुशी पाहून, स्वतःचे दुःख वा तणाव क्षणभर विसरून जातील. जो साधक सदा खुश राहतो, त्याच्या उपस्थितीमुळे सभोवतालचे वातावरण देखील सुख-शांती संपन्न बनते. अशारीतीने वर्तमानसमयी जो सदा खुश असतो तोच भविष्यात येणाऱ्या विघ्नरूप परिस्थितीत दुसऱ्यांना धैर्य, सांत्वना वा हिंमत देण्याची सेवा करू शकेल. त्याचबरोबर जो नेहमी खुश राहतो तोच अशरीरी, विदेही वा फरिश्ता स्थितीत टिकू शकतो. कारण त्याच्या मनाचे भटकणे बंद झाल्याने, तो स्वतःला तृप्त, भरपूर वा संपन्न अनुभव करतो. त्याचे मन नेहमी 'पाना था सो पा लिया, अब बाकी क्या रहा, शुक्रिया, शुक्रिया!' हेच गीत गात असते. तो सदा स्वमानात राहून आत्मचिंतन व प्रभूचिंतन करत असतो. तो सदैव व्यर्थ व साधारण संकल्पांपासून मुक्त असतो. अशा साधकाच्या जीवनात सर्व गुण, सर्व शक्ती व सर्व ज्ञानरत्ने एखाद्या परछायेप्रमाणे सोबत असतात. फलस्वरूप त्याच्या प्रत्येक संकल्प, बोल व कर्मात सफलता सामावलेली असते.

जो सदा खुश असतो तोच सर्वांना शुभभावना व शुभकामना प्रदान करू शकतो. खुशीत राहून प्रत्येक कर्म केल्याने, त्याचे प्रत्येक कर्म कलात्मक व प्रेरणादायी असते. खुशीत राहणारा सदा गुणग्राही, धैर्यचित्त, उपराम तसेच बेहदचा वैरागी असतो. तो डबल लाइट फरिश्ता स्थितीचा अनुभव करतो. म्हणूनच समयानुसार आता सदा खुश राहण्याचा पुरुषार्थ करणे आवश्यक आहे. त्यासाठी **शिवबाबा नेहमी समजावून सांगतात, 'काहीही झाले तरी खुशीचे वरदान कधी विसरू नका. समस्या येईल व जाईल परंतु खुशी कधीही जाता कामा नये कारण खुशी ही तुमची वस्तू आहे.'** समस्या ही परिस्थितीच्या आधारे येते. दुसरीकडून येते. परंतु खुशी मात्र आपली वस्तू आहे. दुसऱ्याची वस्तू तर येईल व जाईल. परिस्थिती मायेची आहे, आपली नाही. त्यामुळे खुशी कधी जाता कामा नये. हे शरीर जरी गेले तरी खुशी जाता कामा नये. खुशीत शरीर सोडले तर अधिक चांगले शरीर मिळेल. जुने जाईल, नवीन प्राप्त होईल.

वास्तविक खुशी हाच आत्म्याचा खुराक आहे. त्यामुळेच म्हटले जाते, 'खुशी जैसी खुराक नही और गम जैसा रोग नही।' खुशीत राहिल्याने आत्म्याचे बळ वाढत जाऊन, आपण मास्टर सर्व शक्तिवान स्थितीचा अनुभव करू लागतो. चालता-फिरताना सहजच निराकारी आत्मिक स्थितीत टिकून राहतो. परिणामतः जीवनातील छोट्या-मोठ्या गोष्टींचे चिंतन चालत नाही. मुख्य म्हणजे नकारात्मक व व्यर्थ चिंतन बंद झाल्याने आपले शारीरिक व मानसिक सर्व आजार सहज दूर होतात. इतकच नव्हे

तर सदा खुशीत राहून, दुसऱ्यांनाही खुशी वाटत राहिल्याने त्यांनाही व्याधीमुक्त बनविण्यासाठी आपण निमित्त बनतो अर्थात रुहानी (आत्मिक) डॉक्टर बनतो.

तात्पर्य म्हणजे स्थायी खुशी ही बाह्य जगतापासून नाही तर आंतरिक अनुभूतीमुळे किंवा ईश्वरी प्राप्तीमुळे आपल्या चेहऱ्यावर दिसून येते. **वास्तविक खुशी हा शब्द देखील फार अर्थपूर्ण आहे. त्यातच सदा खुश राहण्याचे रहस्य सामावलेले आहे. खुशी = खु+शी अर्थात 'खुद की स्मृती' (मी आत्मा सत्-चित्-आनंद स्वरूप आहे.) तसेच 'शिव परमात्मा पिता की स्मृती' (शिव पित्याच्या स्मृतीने सर्व प्राप्तींची अनुभूती)**. यावर्षी प्राणेश्वर बापदादांनी प्रत्येक मुरलीतून आपल्याला सदा खुश राहण्याचे होम वर्क दिले आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखात आपली खुशी कमी होण्याची काही कारणे व त्यांचे निवारण याविषयीचे विवेचन थोडक्यात पाहू या.

### ❒ देहभानात आल्यामुळे खुशी कमी होते

ज्यावेळी आपण देहभानात येतो तेव्हा कोणी आपला अपमान केला, निंदा केली, सन्मान दिला नाही, विघ्नरूप बनला यासारख्या गोष्टींची प्रकर्षाने जाणीव होते. अशावेळी खुशी कमी होते. तसेच त्या व्यक्तींविषयी नकारात्मक संकल्प चालतात व त्याचा बदला घेण्याची भावना निर्माण होते. हे सर्व टाळण्यासाठी निरंतर आत्मिक स्वरूपामध्ये रहाण्याचा पुरुषार्थ करणे आवश्यक आहे. **म्हणूनच ज्ञानसागर शिवबाबा प्रत्येक मुरलीतून आत्मिक स्थितीमध्ये रहाण्याची शिकवण देत असतात. आपली स्थिती आत्मिक रहावी, यासाठी अमृतवेळेचा योग, मुरली क्लासच्या पूर्वी योग, संपूर्ण पवित्रता, श्रीमतानुसार आचरण, ईश्वरी सेवा, स्वमानाचा अभ्यास इत्यादी गोष्टींचे नियमित पालन करणे आवश्यक आहे**. या पुरुषार्थानेच आत्मबळ वाढून देहभान नष्ट होते. आपण स्वतःला एक आत्मा किंवा शक्ती पुंज अनुभव करतो. अशा स्थितीत रहाणाऱ्यांना दुसऱ्यांचे दोष दिसत नाहीत. प्रत्येक परिस्थिती ही कल्याणकारी व सुखद अनुभवाला येते. फलस्वरूप आपले मन प्रभू मीलनात मस्त राहून, अतींद्रिय सुखाची अनुभूती करते व ते आंतरिक सुख आपल्या चेहऱ्यावर खुशीच्या रूपाने दिसून येते.

### ❒ वृत्तीमध्ये ईर्ष्या, द्वेष, घृणाभाव उत्पन्न झाल्याने खुशी कमी होते

आपल्या संबंध-संपर्कात राहणारी एखादी व्यक्ती जेव्हा आपल्या मनाविरूद्ध व्यवहार करते तेव्हा त्या व्यक्तीविषयी आपल्या मनात सतत नकारात्मक विचार चालतात. परिणामतः त्या व्यक्तीविषयी वृत्ती वा भावना देखील नकारात्मक बनतात. वृत्तीमध्ये ईर्ष्या, द्वेष, घृणाभाव, वैर-विरोध, क्रोध उत्पन्न होतो. अशी व्यक्ती जेव्हा आपल्या-समोर येते तेव्हा आपली खुशी कमी होते. असे होऊ नये यासाठी आपल्या मनाला वेळीच समजावून सांगा की, 'हे मना, ती व्यक्ती माझ्याशी जो व्यवहार करीत आहे, तो माझ्याच पूर्व कर्मांचा हिशोब आहे. तो आता पूर्ण होत आहे. त्या व्यक्तीच्या व्यवहारात माझे काही ना काही कल्याण जरूर सामावलेले आहे. त्यामुळे तू या गोष्टीबद्दल व्यर्थ विचार करू नकोस. हे मना, तू माझ्या आत्मिक भावाविषयी नकारात्मक चिंतन करून, आमचे संबंध सुद्धा बिघडवले आहेस. स्वतः परमात्मा शिवपिता माझ्या आत्मिक भावाला 'मीठे बच्चे, लाडले बच्चे, प्यारे बच्चे' म्हणून रोज संबोधत आहे. तू मात्र त्याच्याविषयी नकारात्मक चिंतन करीत आहेस. आता तू ते पूर्णतः थांबव. रोज शिवबाबा जो सन्मान देतात, त्याचेच चिंतन कर. मुरलीतील महावाक्यांचे चिंतन कर.' अशातऱ्हेने आपल्या मनमंत्रीकडे वेळोवेळी नीट लक्ष दिले तर आपली वृत्ती सर्वांविषयी सकारात्मक राहिल. आपली स्थिती दिवसेंदिवस समर्थ बनत जाऊन आपली खुशी वृद्धींगत होत जाईल.

### ❒ आपण जेव्हा जुन्या संस्कारांच्या वशीभूत होतो तेव्हा आपली खुशी कमी होते

आपण जेव्हा आळस व निष्काळजीपणा यांच्या वशीभूत होतो किंवा ईश्वरी नियम व मर्यादांचे उल्लंघन करतो तेव्हा आत्मिक उन्नती थांबून, आपला देहभान जागृत होतो. परिणामतः अतींद्रिय सुखाची प्राप्ती होत नाही. अशावेळी आपण क्षणिक सुखासाठी इंद्रियाचे गुलाम बनत जातो. तेव्हा माया येऊन आपल्याला थप्पड मारते व आपली खुशी कमी करते. याला कारण म्हणजे मायादेखील

शिवबाबांची मुलगी असल्याने, मायेशी आपला संबंध भाऊ-बहिणीचा आहे. लौकिकमध्ये जेव्हा आपण वडिलांचे म्हणणे ऐकत नाही तेव्हा मोठी बहिण भावाला थप्पड मारते. त्याच-प्रमाणे अलौकिकमध्ये जेव्हा आपण ईश्वरी नियम व मर्यादांचे उल्लंघन करतो तेव्हा माया थप्पड मारते. म्हणूनच प्रत्येकाने ईश्वरी श्रीमताचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. तसेच सदा श्रेष्ठ स्वमानात राहून ईश्वरी नशेचा अनुभव केला पाहिजे. फलस्वरूप आपल्याला अतींद्रिय सुखाची प्राप्ती होत राहिल. त्यामुळे आपल्या चेहऱ्यावर सदा खुशी दिसून येईल.

**❒ संगमयुगातील प्राप्तीच्या विस्मृतीने खुशी कमी होते**

संगमयुगात आपण किती भाग्यवान आहोत. स्वयं भाग्यविधाता परमात्मा पिता आपल्याला भेटला आहे. सत्ययुगी राज्यअधिकारी बनविण्यासाठी तो परमशिक्षकाच्या रूपाने आपल्याला राजयोग शिकवित आहे. सर्व गुण व सर्व शक्तींचे वरदान देत आहे. सद्गुरूच्या रूपाने प्रत्येक क्षणाला आपल्या सोबत त्याचा वरदहस्त आहे. संगमयुगात आपला ईश्वरी जन्म आहे. परमात्मा शिवपिता सर्व संबंधांनी आपली पालना करीत आहे. स्वतः शिव भोलानाथ आपल्या समोर ज्ञानाचे डमरू वाजवून सृष्टीच्या आगम-निगमाचे सारे भेद स्पष्ट करीत आहे. आपला ब्राह्मण जन्म हा दिव्य जन्म, हिरेतुल्य जन्म आहे. भविष्यातील आपले २० जन्म महान असणारच. एवढच नव्हे तर कल्प-कल्पांतर आपला पार्ट असाच महान असणार आहे. अनादि स्वरूपात परमधाममध्ये आपण परमात्म्याच्या एकदम जवळ चमकत्या ताऱ्याप्रमाणे असू. आदि स्वरूपात सर्व गुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी असू. फलस्वरूप प्रकृती आपली दासी असेल. त्यामुळे स्वर्गात सर्व सुख प्राप्त असतील. द्वापर युगात मंदिरात पूजनीय स्वरूपात भक्त आपली पूजा करतील. आता संगमयुगात आपण 'ब्राह्मण सो फरिश्ता' बनतो. अशारितीने संपूर्ण कल्पातील महान भाग्याचे आपण अधिकारी आहोत. त्यामुळे सृष्टीचक्रा-तील या पाच स्वरूपाची (अनादि, आदि, मध्य, ब्राह्मण व फरिश्ता) स्मृती जर आपल्या बुद्धीत असेल तर आपोआपच आपल्याला सदा खुशीची अनुभूती होत राहिल. पिताश्री ब्रह्माबाबांप्रमाणे आपल्याही रोमरोमात खुशी भरून राहिल. **म्हणूनच शिवबाबा नेहमी सांगतात की, 'माझी आठवण करताना त्यासोबत माझ्यापासून होणाऱ्या प्राप्तींचीही आठवण करा म्हणजे तुम्हाला अपार खुशीचा सदा अनुभव होत राहिल.'**

**❒ व्यर्थ संकल्पांमुळे खुशी कमी होते**

कारणे-अकारणे जेव्हा मनामध्ये व्यर्थ विचार चालतात तेव्हा आपली खुशी कमी होते. याउलट ज्यांच्या मनात सदा समर्थ विचार चालतात ते स्वतःला सदा खुश तसेच शक्तिशाली स्थितीचा अनुभव करतात. म्हणूनच आपली खुशी कायम टिकवायची असेल तर मनातील व्यर्थ संकल्परूपी छिद्रे बंद करणे गरजेचे आहे. एकदा एक साधक आपल्या गुरुंकडे गेला व त्याने गुरूंना एक प्रश्न विचारला की मी साधना करतो परंतु मला अनुभव मात्र होत नाही. त्यावर गुरूंनी सांगितले की तू तुझ्या मनातील व्यर्थ संकल्परूपी छिद्रांना बंद कर म्हणजे तुला अनुभव होतील. त्याचप्रमाणे आपणसुद्धा आपल्या मनातील व्यर्थ विचारांना थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी रोज अमृतवेळेचा योग झाल्यानंतर, मनाचे टाइमटेबल ठरवा. दिवसातून अधिकाधिक वेळा पाच स्वरूपाचा अभ्यास करा म्हणजे व्यर्थ विचारांपासून मुक्त व्हाल.

अशाप्रकारे आपले जीवन सदा खुशीने संपन्न बनविण्याचा आपण यावर्षी पुरुषार्थ करू या. **त्यासाठी अव्यक्त मुरलीतील बापदादांची पुढील स्लोगन सदैव लक्षात ठेवा, 'मीठे बच्चे, यहाँ (मस्तकपर) लिख दो, सदा खुश रहना है और सबको खुश करना है।'** यानुसार जो नेहमी खुश राहिल त्याच्याद्वारे भविष्यात अनेक आश्चर्यकारक सेवा होतील. सदा खुशीत राहणाराच आपल्या चालन व चेहऱ्याद्वारे परमात्म प्रत्यक्षतेसाठी निमित्त बनेल.

वर्तमानसमयी स्वयं परमात्मा शिव पिता मूर्तिकार बनून, आपली चैतन्य दिव्य मूर्ती बनविण्याचे कार्य करीत आहेत. जस एखाद्या मूर्तीचे मूल्य हे तिच्या चेहऱ्यावरील हावभावा-वरून ठरविण्यात येते तसेच आपल्या चेहऱ्यावरील स्थायी खुशी वा दिव्यता हीच आपली स्वतःची तसेच मूर्तिकार, परमात्म्याची प्रत्यक्षता करेल. त्यामुळे सर्वप्रथम ज्या गोष्टींमुळे आपली खुशी कमी होते, त्यांच्यापासून दूर

▶ पान क्र. २८ वर

# संतुष्टता हीच आत्म्याची खरी संपत्ती

*-- ब्र.कु.गुणवंत पाटील, बिबवेवाडी (पुणे).*

'संतोषं परमं सुखम्'. संतोष सर्व गुणांची खाण आहे. तसेच सर्वश्रेष्ठ धन आहे. जे काही मिळते ते ईश्वरीय देण म्हणून स्वीकारले पाहिजे, ही समजच आपले भाग्य निश्चित करते. संतोष धनासमोर सर्व धन तुच्छ आहे, म्हणून इतरांच्या भाग्याशी, प्राप्तीशी तुलना न करता जे आपल्या वाट्याला आले, त्यातच राजी राहावे. हीच सद्‌भावना ठेवावी की,

**साई इतना दीजिये, जामे कुटुम्ब समाय,**
**आप भी भूखा न रह, साधू ना भूखा जाय।**

खरा संतोषी कधी ही लोभ करीत नाही, कारण तो जाणतो की संतोषाचे फळ गोड असते.

एकदा एका गावात दुष्काळ पडला. लोक भूकेने मरू लागले. तेव्हा त्या गावच्या पाटलाने, गावच्या मुलांना रोज भाकरी वाटायला सुरूवात केली. गावची मुले धक्का-बुक्की करीत. रांगा लावित. एक मुलगी मात्र सर्वात शेवटी रांगेतून आपल्या वाट्याची भाकरी घेई. मुलीला आईशिवाय दुसरे कोणी नव्हते. भगवंताचे गुणगान गात त्या दोघी सुख-शांतीने राहत.

एके दिवशी मुलगी भाकरी घेऊन घरी आली. त्यांना भाकरीत सोन्याचे दोन-दोन मणी सापडले. आईने मुलीला ते सोने पाटलाला परत द्यायला सांगितले. मुलगी सोने व भाकरी घेऊन पाटलाकडे गेली. 'पाटीलदादा, हे सोने घ्या.' पाटलाला मोठे नवल वाटले. मुलीने सारी हकीगत पाटलाला सांगितली. हकीगत ऐकताना पाटील मुलीकडे पहात होता. त्याला खरे तर सारे माहीत होते की ही मुलगी सर्वात शेवटी रांगेतून भाकरी नेते.

पाटील म्हणाला, 'मुली, तू हे घेऊन जा. हे तुझ्या संतोषाचे फळ आहे.' मुलगी म्हणाली, 'दादा माझ्या संतोषाचे फळ तर मला आधीच मिळाले आहे ते म्हणजे मला गर्दीत धक्के खावे लागत नाहीत.' पाटलाला वाटले की मुलगी इतकी लहान असूनही तिला किती समज आहे. पाटलाच्या मोठ्या मिनतवारीनंतर ती मुलगी ते सोन्याचे मणी घेऊन घरी गेली. पाटलाने नंतर मुलीच्या आईला बोलावून घेतले. पाटील निपुत्रिक होते. त्यांनी मुलीला धर्मपुत्रीच्या अधिकारात आपल्या संपत्तीचे वारस केले.

स्थूल धनापेक्षाही संतोष हे धन श्रेष्ठ आहे. त्या मुलीला तिच्या संतोषाचे मोठे बक्षिस मिळाले. ती मुलगी खरच संतुष्टमणीच होती. अशाच प्रकारची संतुष्टता परमपित्याला अभिप्रेत आहे. भाग्यशाली मुलेच संतुष्टमणी असतात. तेच आपल्या 'पाना था सो पा लिया' या धारणेमुळे सर्वदा संतुष्टस्वरूप असतात. अशा आत्म्यांची परमात्माही वाह ! वाह ! करतात.

**संतुष्टता याचा अर्थ असा नाही की आपण आपली उन्नती करू नये, पुरुषार्थ करू नये वा धन कमावू नये. संतुष्टतेचा अर्थ आहे, आपल्याला जे मिळाले त्यात खुश राहणे. दुसऱ्या व्यक्तीला जर आपल्यापेक्षा अधिक मिळाले तरी त्याला पाहून असंतुष्ट न होणे कारण यातून आपल्याला दुःखाची अनुभूती होते.** त्यामुळे दुसऱ्या व्यक्तीला अधिक मिळाले असेल तर ही चांगली गोष्ट समजावी. सर्वांचे भले होवो, अशी कामना करावी.

संतुष्टमणी आत्मा आपल्या निःस्वार्थ सेवेने, संतुष्ट स्वरूपाने आपल्या अनेक सहकाऱ्यांच्या, मित्रांच्या जीवनात आनंदाचा, समाधानाचा, संतुष्टतेचा प्रकाशदीप चेतवतो. दुःखी, अशांत, त्रस्त आत्म्यांच्या मना-मनात, अंतःकरणात सुख-शांती, खुशी, प्रसन्नतेची पहाट फुलवतो. तेव्हा असे अनुभव संपन्न आपल्याला व्हायचे आहे. हाच अनुभव आपल्या अपूर्व संतुष्टीचे गमक, इंगित व्हावे. किंबहुना या सुखद परिवर्तनानेच आपला पुरुषार्थ कृतार्थ होईल.

**संतुष्ट होण्याची औषधी पण परमपित्याने सांगितली आहे. किती सोपी, सहज स्वस्त व मस्त अशी ही औषधी आहे. 'मेरा बाबा'. संतुष्टमणी मुले बेफिकर बादशाह असतात** कारण त्यांनी डबल लाइटचा ताज (मुकुट) धारण केलेला असतो. हा ताज धारण करण्याची विधीही फार सोपी आहे. फक्त 'माझे'चे तुझ्यात परिवर्तन करणे, बदलणे. डबल लाइट म्हणजे एक सदा हलके, निश्चिंत राहणे व

दुसरा ताज आहे पवित्रतेचा, शुद्धतेचा, स्वच्छतेचा.

यापुढे दु:ख वाढतच जाणार आहे. परिस्थितींनी, समस्यांनी सर्वत्र खळबळ माजेल. रोगराई, आजार वाढतील. महापूर, भूकंप असे निसर्ग प्रकोप वाढतील. दुष्काळ, अतिवृष्टी यांचा कहर होईल. अशावेळी अचल, अडोल रहात मन खुश ठेवले म्हणजे शरीर व्याधिग्रस्त असूनही आपण दु:खमुक्त, वेदनामुक्त संतुष्टतेची अनुभूती करू. **परमपिता सर्व आत्म्यांना संतुष्टमणीच्या रूपात पाहू इच्छितो. संतुष्टता मोठी शक्ती आहे. त्यामुळे आम्हा मुलांच्या चेहऱ्यावर स्मित हास्याची, प्रसन्नतेची अनोखी प्रकाशछटा चमकत राहावी. संतुष्टतेची शक्ती कोणत्याही समस्यांचे निराकरण करील.** संतुष्टतेमुळे सर्व शक्ती सहज प्राप्त होतील. विपरीत वायुमंडल वा परिस्थिती बदलून टाकण्याची ताकद संतुष्टतेत आहे. मायेचे विकार, प्रकृतीजन्य विकृतींनी उद्‌भवणारी हालचाल यांना संतुष्टता समाप्त करते. ही सारी किमया संतुष्टता घडवते. म्हणूनच आपल्याला सर्वदा संतुष्ट, प्रसन्नचित्त, खुश राहिले पाहिजे. परिणामी आपल्या संतोषाने इतरांचेही नैराश्य, उदासिनता दूर होईल.

संगमयुगाचा हा काळ परिवर्तनाचा आहे. यात जुन्या वृत्ती, प्रवृत्ती, संस्कृती, समाजातील विचार प्रवाहातील संकीर्णतेच्या बदलाची गरज आहे. तरच समाजजीवनात व्यक्ती-व्यक्तीत सुख-शांतीची, संतुष्टतेची, समृद्धींची पेरणी होईल. हे परिवर्तन शिव धनुष्य आहे. ते पेलण्याचा निर्धार आम्हा शिवपुत्रांची, ब्रह्मावत्सांची जबाबदारी आहे.

'प्राप्तकाल हा विशाल भूधर। सुंदर लेणी त्यात खोदा।' हा एका कवीचा आशावाद अनेक संदर्भात स्वर्ग-स्वप्नांना उजाळा देईल. शिवबाबांची शिकवण ही खरेतर कालातीत आहे. आज घडीला तर तिची विश्वाला, समस्त समाजाला नितांत गरज आहे. त्या शिकवणीच्या, प्रभुदत्त ज्ञानाच्या यथार्थ धारणेनेच विश्वकल्याण होईल. खऱ्या अर्थी सुख-शांती संपन्न, संतुष्ट, समाधानस्वरूप, न्यायी, निरामय समाजाचे निर्माण होईल.

आजचा युवा ही प्रचंड उर्जा आहे. ही उर्जा व्यर्थ जाण्याचा धोका आहे. तिला योग्य संधी, मार्गदर्शन न मिळाल्यास ती भरकटत जाईल. अध्यात्माने ही उर्जा परिवर्तीत होऊन युवाशक्ती नवी विधायक क्रांती, बदल घडवू शकेल. अध्यात्म ही केवळ वृद्धत्वाची ओळख नाही. भारताच्या इतिहासात तरूणही आध्यात्मिक क्षेत्रात उंचीवर होते. गौतम बुद्ध, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, दयानंद, विवेकानंद ही त्याची मोठी उदाहरणे सांगता येतील. आज विश्वात एकात्मता, बंधुभाव, शांती, सौहार्द आणि विश्वास निर्मितीसाठी ईश्वरीय ज्ञानाची गरज आहे. त्यासाठी सैनिक नाहीतर शस्त्र, प्रवासी नाहीतर रस्ता, विद्यार्थी नाहीतर शाळा बदलायला हवी. प्रवृत्तीत नाहीतर वृत्तीत परिवर्तन हवे. समाधान पैशाच्या श्रीमंतीने नाही तर मनाच्या, श्रेष्ठ संस्कारांच्या श्रीमंतीने मिळेल.

**म्हणून जगणे सुंदर व संतुष्टीचे होण्यासाठी ईश्वरीय ज्ञानाचे अधिष्ठान हवे, कारण ज्ञानानेच जीवन सार्थकी व सफल होईल.** आजकाल झगमगत्या प्रकाशात ही मने काळोखाने भरलेली असतात. पण सूर्यास्तानंतरही ज्यांच्या अंत:करणात ज्ञानाची सांजवात पेटते, उजळते ते खरे ज्ञानी. खऱ्या ज्ञानीला उदासिनता, खिन्नता कधी ही ग्रासत नाही. तो सदैव संतुष्ट व प्रसन्नचित्त असतो.

परमात्मा ज्ञानसागर आहे. गेल्या ७५ वर्षांपासून तो ज्ञानवर्षा करीत आहे. ज्ञानाची अनंत दालने त्याने आमच्यासाठी उघडली आहेत. घेणाऱ्याने फक्त तपासून पाहायचे आहे की माझी झोळी किती फाटकी आहे. तरीही लक्षात ठेवा मी संपादन केलेले ज्ञानही त्या ज्ञानसागरातील एक ओंजळ आहे. त्याचा अवतार ज्ञानासाठी आहे. तो रोज शिकवत आहे. प्रत्येकाला ते सारे ग्रहण करत अभ्यासाने, अनुभवाने ज्ञानसंपन्न (knowledgful) व्हायचे आहे. निरंतर अभ्यासानेच आपल्या जाणीवा, नेणीवा संपन्न होतील. त्यासाठीच आपला प्रयास पुरुषार्थ व्हावा.

व्यर्थांची जळमटें आपल्या वाटेत जागोजागी पसरली आहेत. या अनेक व्यर्थांनी आपली समर्थी संपुष्टात येऊन, आपली संतुष्टी धोक्यात आली आहेत. आपण जर विवेकाची वाट सोडली नाही, कुठल्या मोहात पडलो नाही, सद्‌गुणांची कास सोडली नाही आणि मुख्य म्हणजे परमपित्याचा हात सोडला नाही तर आपले गंतव्य स्थान

- मंजिल दूर नाही. सदैव ध्यानी ठेवले पाहिजे की मायेने मला शापित केले आहे. तेव्हा शापमुक्त, पापमुक्त होण्यासाठीच माझा पुरुषार्थ तीव्र झाला पाहिजे. आज माझी सत्ययुगी जीवनशक्ती (battery) क्षीण झाली आहे कारणे अनेक असतील. पण ती संप्रेरित (charged) संगमयुगात ज्ञान व योगानेच व्हायची आहे. योगाने हृदय शुद्ध होते, विकर्म विनाश होतात. प्रत्येक पाऊल श्रीमतानुसार पडायला हवे. मला सुगंधी फूल बनायचे आहे, मी फाइन (शुद्ध) झालो तर मला फाइन (दंड) होणार नाही. प्रभूच्या निरंतर स्मृतीनेच मी आबाद, समृद्ध, संपन्न होईल.

**आत्म्याची थोरवी निर्विवाद आहे पण कर्म करण्यासाठी, जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी मिळालेला नरदेह याचे महत्त्व कमी होत नाही. ते तर धर्मसाधनच आहे. आत्म्याच्या अभिव्यक्तीसाठी देह हवाच. तो नसेल तर आत्म्याची प्रत्यक्षता तरी कशी होणार?**

जेव्हा देहाचा विचार होतो तेव्हा त्याच्या एक-एक अवयवाचे मोल किती आहे हे समजते. मन-बुद्धी संपन्न आत्म्याच्या नियंत्रण कक्षेत डोळे, नाक, कान, मुख, जीभ नसतील तर आत्म्याची जीवनयात्रा होईल कशी? ही कर्मेंद्रिये आत्म्याचे सेवक असले तरी त्यांचे महत्त्व असाधारणच आहे. डोळे तर विश्वाचे विराट रूप कवेत घेणाऱ्या दुर्बिणी आहेत. कान आत्म्याच्या श्रुती आहेत. कान संवाद, संगीत यांच्या माध्यमातून जीवन समृद्ध करतात. नाक श्वसनातून प्राणवायू पुरवून देहात प्राण फुंकते. अनेकाविध गंध-सुगंधाची मौज नाकानेच अनुभवता येते. सरळ, बाकदार नाक देहाचे लेणे आहे. मुखाने बोलता येते. भावना व्यक्त करता येतात, संवाद घडतो. रूचिवैचित्त्य कळते. अन्न मुखाद्वारे पोटात जाते, त्याने देहाचे पोषण होते. हात-पाय तर या रथाचे घोडे आहेत. सारी कर्मण्यता हातापायात एकवटली आहे. या कर्मेंद्रियांचा आपण तसा कमीच परामर्श घेतो, दखल घेतो. त्यामुळेच माया त्यांना सहज वश करते. पण या अवयवांचे मूल्य ते जेव्हा बिघडते वा निकामी होते तेव्हाच कळते. म्हणूनच मनाच्या प्रसन्नतेसाठी, खुशीसाठी, उमंग-उत्साहासाठी देहाचे आरोग्यही नीट सांभाळले पाहिजे.

या देहाला वेळोवेळी विश्रांतीही आवश्यक आहे. व्यसनाधिनता शरीराची नासाडी करते. तब्येतीची हेळसांड केल्याने कार्यक्षमता खालावते. शरीर क्षीण होते. मग आत्मा कमजोर होतो. आपल्या भल्या-बुऱ्या सवयींनी आपल्या भावना, संवेदना प्रभावित होतात म्हणून चांगल्या सवयी लावून घ्याव्यात. त्यामुळे मन संतोष पावते.

**तथापि शरीराची अवस्था कशीही असो तरी आपली खुशी, प्रसन्नता कमी होणार नाही याबद्दल दक्ष असावे, कारण संतुष्टता ही आत्म्याची खरी श्रीमंती आहे. देहाचा हिशेब देहच जाणे. मन मात्र सदा खुश, सदा प्रसन्न, सदा तृप्त! बेफिकर बादशाह ही आपली खरी ओळख आहे, कारण आपण सुखस्वरूप, आनंदस्वरूप आत्मा आहोत.** मनाचे आरोग्य जपण्यासाठी मानसोपचार ही संशोधनप्रणाली विकसित करण्यात आली आहे. तसेच योग मनाचे शास्त्र आहे. अनेक आजारांचे मूळ मन आहे. म्हणूनच मनाची संतुष्टता टिकवली पाहिजे. मनाची सुन्नता, खिन्नता जगणे बेचव करते.

**संत तुकोबा म्हणतात, 'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण।' मन आपला भाग्योदय करते. मानसिक प्रसन्नता ही परमार्थाची वाट आहे.** योगी हा स्थिरचित्त असतो. सदा समाधानी असतो, निर्मोही असतो, ईश्वरनिष्ठ असतो. मनाची सावधानता त्याच्याकडे असते. त्यामुळे तो विचारात, संकल्पात, व्यवहारात दक्ष तसेच प्रगल्भ असतो. म्हणूनच योगी श्रीमंत असतो, श्रीमंतयोगी!

बालपणातील उदंड, सळसळता उत्साह, संतुष्ट करणारे चैतन्य पुढील वयातही टिकवले पाहिजे. त्यामुळे जीवनात बहार येईल. जीवन संघर्षात या कर्म क्षेत्रात जेव्हा अर्जुनाची जिज्ञासा आणि शिवपित्याचा विवेक यांची मंगल युती घडते तेव्हा केवढे मोठ तत्वज्ञान (गीता) जन्माला येते. दुसऱ्या शब्दात हे आहे आत्म्याचे बेहदचे वैराग्य व परमपित्याची कल्याणवृत्ती. हे जगणे एक सफर आहे, प्रवासयात्रा आहे. आत्मा प्रवासी आहे. या धरतीवरचा पाहुणा आहे. प्रवासाचे सारे दिवस, सारी स्थळे, ठिकाणे एक सारखी कशी असतील? त्यातील विविधतेची मजा लुटली पाहिजे. या विविधतेत नवीनता शोधली पाहिजे. तर ती

यात्रा सुखद, मनोरंजक होईल. मुख्य म्हणजे आता या घडीला तर या यात्रेत विघ्नविनाशक, प्रेमळ पिता सोबत आहे, मग चिंता कसली?

आमची खुशी वा संतोष कायम राहावा म्हणून शिव-पित्याने ड्राम्याची ढाल दिली आहे. चित्रपट पाहणारा जसा त्यातील कुठल्याही दृश्याने प्रभावित होत नाही, दुःखी होत नाही वा त्यातील आनंदाच्या प्रसंगांनी फारसा फुलत नाही, तथापि चित्रपटातील विनोदांना हसतो. त्याची मजा घेतो. याचे कारण सोपे असते. जे समोर पाहतो ते खोटे आहे, नाटक आहे, अशी त्याची साक्षी, प्रामाणिक भावना असते. तसेच **शिवबाबा सांगतात, 'मुलांनो, तुम्ही जर साक्षी होऊन प्रत्यक्ष आयुष्यातील घटनांकडे नाटक वा ड्रामा म्हणून पाहाल तर तुमची खुशी, आनंद, शांती, संतोष कायम राहील.'**

हा जीवनाकडे पाहण्याचा अर्थात जगण्याचा दृष्टिकोन जसा वास्तविक तसाच सकारात्मक असावा. सकारात्मक दृष्टिकोनामुळे आपले विचार शुभ व शक्तिशाली होतात. जशी दृष्टी तशी सृष्टी. समर्थ संकल्पांमुळे यशाचे वातावरण बनते, होणारे कर्म सफलता देते. जेव्हा आपले प्रत्येक कर्म श्रेष्ठ व सफल होते तेव्हा प्रसन्नता वाढते. नेहमी प्रसन्न असणारी व्यक्ती दुसऱ्यांसाठी प्रेरणास्त्रोत बनते. प्रसन्नता आयुष्य वाढवते. ही सारी सकारात्मक दृष्टिकोनाची उपलब्धी आहे. जगण्याचा अधिकाधिक आनंद घेण्यासाठी, जगणे निर्विघ्न होण्यासाठी, आपली जीवन-शैली नाटकात वा चित्रपटात भूमिका करणाऱ्या नटाची, अभिनेत्याची असावी हे स्पष्ट आहे. **नटाच्या भूमिकेत जगल्यास समस्या सुटतील, कमीही होतील, बुद्धीत सदा असेल की हे काही घडीचे नाट्य आहे. ते संपले की घरी जायचे आहे. मग सारेच प्रश्न सुटतील. उरतील फक्त उत्तरे अन् उत्तरेच, जी फक्त अत्तराचा सुगंध देतील.**

सोबतचे सहकलाकारही त्यांच्या भूमिका निर्धारीत नाट्यानुसार करीत आहेत. मग खेद वा खंत कसली? शिवाय येथला आनंद वा सुखही अविनाशी नाही. सत्य फक्त एकच, मी आत्मा आहे. सोबतीही आत्मेच आहेत. मुख्य म्हणजे संगमयुगात खुदा दोस्त सोबत आहे. साऱ्यांचे घर एकच, जेथे शेवटी जायचे आहे. मग मी माझी खुशी का दवडावी? व्यर्थ दुःख का करावे?

पुन्हा प्रश्न फक्त आपल्या एकट्याच्या खुशीचा नाही तर सारा संसार हा दुःखमुक्त, सुखी व्हावा हे आपले मनोरथ व्हावे. प्रत्येक घर गृहस्थी, प्रवृत्ती निर्विघ्न, समाधानी व्हावी, ही दुनिया स्वर्ग व्हावी ही परमात्म्याची श्रेष्ठ मनिषा आहे. काळ बेचैनीचा आहे. विपदा वाढणार आहेत. दुःख व अशांतीने समाज त्रस्त व होरपळून निघणार आहे. अशा परिस्थितीत आपल्याला स्वतःची खुशी टिकवायची तर आहेच पण इतरांच्या खुशीसाठी-सुद्धा प्रयास करावयाचे आहेत. आपली खुशी, संतुष्टी हीच आपली संघर्ष ताकद असेल. प्रत्येक ब्रह्मावत्स खुदाई खिदमतगार आहे. ब्रह्माबाबांच्या पावलावर पाऊल टाकण्याची युक्ती आपल्याला या विश्वपरिवर्तनाच्या कार्यात प्रेरणा देईल. सफलता हा ब्रह्मावत्सांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. परमात्मा तर अमृतवेलेपासून चालता-बोलता आपल्यावर वरदानांची खैरात करीत आहे. त्या वरदानांचा फायदा घेणे हा आपला कायदा व्हावा. या वर्षाच्या पहिल्याच दिवशी दृढ संकल्प करणाऱ्यांना पुरुषार्थात बापदादांची खास, विशेष मदत होईल अशी अनुपम अलौकिक भेट आपल्या सर्वांना मिळाली आहे. या वर्षी संतुष्टतेची शक्ती विशेष कार्य करताना हमखास यश देईल हे परमपित्याचे वरदान आहे. म्हणून संतुष्टमणी होणे हा आमचा ध्यास, निर्धार झाला पाहिजे.

**संगमयुग विशेष युग आहे. या विशेष युगात विशेषतेच्या बीजाचे सर्वश्रेष्ठ फळ 'संतुष्टता' आहे. संतुष्ट रहाणे आणि सर्वांना संतुष्ट करणे हेच विशेष आत्म्याचे लक्षण आहे. संतुष्टता खरे तर आत्म्याची श्रीमंती आहे. संतुष्टतेची स्पंदने सर्वत्र पसरवण्याची कमाल व धमाल ब्रह्मावत्सांनी करावी, असा परमपित्याचा नेक मनसुबा आहे. हे श्रेष्ठ दायित्व निभावणे हेच यापुढे आपले जिवित-कार्य व्हावे. ही हिंमत, दृढ विश्वास आता दाखवायची ही वेळ आहे. आपल्या श्रेष्ठ अनुभवांचा प्रसाद देऊन दुर्बलांनाही सबळ, संतुष्ट बनविण्याचे सर्वश्रेष्ठ पुण्य संपादन करण्याचा पुरुषार्थ आता आपल्याला करावयाचा आहे.** ❖❖❖

# प्रत्यक्षता आणि पश्चात्ताप

***-- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे.***

विश्वातील सर्व प्रकारच्या मनुष्यआत्म्यांना परमात्म अवतरणाचा दिव्य संदेश प्राप्त व्हावा म्हणून ब्रह्माकुमारी संस्थेमार्फत भिन्न-भिन्न प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले अव्याहत चालू आहे. परंतु बहुतांश मनुष्यआत्मे आपल्या व्यवसायात व घरगृहस्थीमध्ये इतके व्यस्त आहेत की, परमात्म्याच्या अवतरणाकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ नाही. इतकेच नव्हे तर सेवानिवृत्त झालेले लोकही वेळ नसल्याचे सांगतात. कित्येक जण योगशिबीरासाठी मधुबनलाही जाऊन येतात परंतु ज्ञानगंगेत न्हावूनही त्या ज्ञानगंगेचा स्पर्श त्यांच्या बुद्धीला काही होत नाही. फलस्वरूप बुद्धीला मायेने लावलेले कुलूप उघडले जात नाही. काही मनुष्यआत्मे तर परमात्म्याला जाणण्यासाठी साक्षात्काराचीही अपेक्षा करतात. काही लोक असेही म्हणतात की, जर परमात्मा अवतरित झाला आहे तर तशी आकाशवाणी का होत नाही? **त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'साधारण वृद्ध तनात अवतरित झालेल्या मज परमात्म्याला कोटीतून कोणीतरी विरळाच मनुष्यआत्मा ओळखतो.' त्याच्या या महावाक्यावरून सिद्ध होते की तो साक्षात्कार, आकाशवाणी, वादळ होणे, विजा चमकणे अशा कोणत्याही प्रकारचा गवगवा न करता अवतरित होतो.** केवळ महाविनाशापूर्वी राहिलेल्या अत्यल्प काळातच परमात्म्याला विश्वातील सर्व मनुष्यआत्मे जाणतील. अर्थात त्यांना अंतिम समयी भिन्न-भिन्न साक्षात्कार होतील व या साक्षात्कारातूनच परमात्म्याच्या अवतरणाची प्रत्यक्षता होईल. या प्रत्यक्षते नंतर मात्र प्रत्येक मंदिरातून, प्रार्थना स्थळातून व चर्चमधून एकच आवाज येईल की, 'प्रत्यक्ष भगवान, आपल्या सर्वांचा परमपिता गॉड, फादर, अल्लाह या भूतलावर कधीच अवतरित झाला आहे.' संपूर्ण विश्वातच परमात्म अवतरणाचे पडसाद उमटतील. परमात्म्याच्या या प्रत्यक्ष-तेमुळे सर्व धर्मातील सर्व मनुष्यआत्मे बेहोष होऊन आनंदाने नाचतील, त्याची महिमा आणि गायन करतील. त्यावेळी संपूर्ण विश्वात कसे अलौकिक वातावरण असेल हे जाणण्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयातील 'खूष होके गा रहा है अब ये जहान सारा, अपना परमपिता शिव, कितना है प्यारा प्यारा' हे गीत अवश्य श्रवण करावे. (मेडिटेशन ३/ए/२) परमात्म्याचे अवतरण, त्याचे कार्य आणि अंतिम प्रत्यक्षता या कल्पातील सर्वात महान घटना आहेत.

एका सत्यधर्माच्या व सत्ययुगाच्या स्थापनार्थ परमात्मा अवतरित झाल्यानंतर जे साधक त्याच्याकडून ज्ञान व योगाद्वारे यथार्थतः प्राप्ती करतात तसेच आपले वर्तमान जीवन हिरेतुल्य बनवून एकवीस जन्मांचा सुख-शांतीचा वारसा हक्क प्राप्त करतात; त्यांची स्थिती महाविनाशात देखील अचल, अडोल, एकरस व सत्-चित्आनंद स्वरूप राहिल. **परंतु जे मनुष्यआत्मे या विद्यालयाच्या अथवा ब्रह्मावत्सांच्या संपर्कात राहून थोडे फार परमात्म ज्ञान प्राप्त करतील अर्थात ते या विद्यालयाचे नियमित विद्यार्थी अथवा साधक बनणार नाहीत त्यांना अंतिम समयी परमात्म प्राप्तीपासून वंचित राहिल्याने घोर पश्चात्ताप होईल. भिन्न-भिन्न क्षेत्रातील आणि व्यवसायातील मनुष्यआत्मे कसा पश्चात्ताप व्यक्त करतील याची काही उदाहरणे पुढे प्रस्तुत केली आहेत. कदाचित हा लेख वाचून त्यांना तीव्र गतीचा पुरुषार्थ करण्याची जाणीव होईल; अशी कल्याणकारी अपेक्षा व शुभेच्छा आहे.**

**बांधकाम व्यावसायिक (बिल्डर, इंजिनिअर, आर्किटेक्ट):**

आम्ही मोठमोठे प्रोजेक्ट पूर्ण करून अनेक टोलेजंग आणि उंच-उंच इमारती बांधल्या. परंतु कल्प-कल्प अवतरित होऊन सत्ययुगाचा प्रकल्प पूर्ण करणाऱ्या परमात्म्याच्या मार्गदर्शनानुसार आम्ही आमच्या २१ जन्मांची २१ मजले असलेली दैवी आणि संपूर्ण पावन भाग्याची अलौकिक अशी इमारत बांधू शकलो नाही. जर आम्ही दररोज चोवीस तासातील एक तास देवून नियमित-पणे परमात्म ज्ञानाची प्राप्ती केली असती तर निश्चित-

पणे सत्ययुगात देवी-देवतांचे सुवर्ण प्रासादही बांधण्याचे भाग्य प्राप्त झाले असते. आम्ही या व्यवसायावर पुढील सात पिढ्या बसून खातील एवढी संपत्ती कमावून ठेवली आहे. परंतु आता हे अब्जावधी रुपयांचे वैभव अल्पावधीतच नष्ट होणार आहे. हे भगवन्, आम्हाला क्षमा कर. तुझ्या या महान कार्यात धनाने तरी आम्ही सहयोग द्यायला हवा होता.

**दुकानदार** : धनाने सुख-शांती प्राप्त होईल ही भ्रामक कल्पना उराशी बाळगून आम्ही केवळ विनाशी धन प्राप्त केले. अविनाशी धनाची जाण मात्र परमात्म ज्ञानामुळे झाली. परंतु हे धन प्राप्त करण्यासाठी आता फार उशीर झाला आहे. **आम्ही सर्व ग्राहकांना 'देवो भव!' म्हणत होतो. परंतु प्रत्यक्ष होवनकार देवी-देवताच दुकानात येऊन आम्हाला ईश्वरीय ज्ञान सांगत होते. ब्रह्मावत्स हेच सत्ययुगात देवी-देवता होणार आहेत हे आम्हाला केवळ आजच्या साक्षात्कारामुळेच समजले.** शरीराला आवश्यक असलेले सर्व पदार्थ व वस्तू आम्ही आयुष्यभर विकल्या आणि विकत घेतल्या. परंतु आत्म्याला आवश्यक असलेले परमात्म्याच्या दुकानातील एखादे पुस्तक ना कधी विकत घेतले ना कुणाला भेट म्हणून दिले. ती सेवा करून आम्ही परमपित्याला सहयोग दिला असता तर आमचेही अलौकिक भाग्य घडले असते आणि पश्चात्ताप करण्याची वेळ आमच्यावर आली नसती.

**पोलिस दल** : आम्ही आमच्या सेवेच्या काळात अनेक चोर, दरोडेखोर व अतिरेकी पकडले. प्रसंगी काही गुन्हेगारांना ठारही मारले. परंतु अंतर्आत्म्यात लपून बसलेल्या कामक्रोधादि दरोडेखोरांना नष्ट करण्याचा आम्ही कधीच प्रयत्न केला नाही. विकारांना नष्ट करून आत्म्याला पावन बनविणे, हे भगवद्‌गीतेचे मूळ तत्वज्ञान अंमलात आणण्याची सुवर्णसंधी ब्रह्मावत्सांमुळे आम्हाला प्राप्त झाली होती. परंतु केवळ दुर्लक्ष केल्याने ती संधी आम्ही गमावून बसलो आहोत. आमच्यातील फार थोड्या पोलिसांनी व अधिकाऱ्यांनी परमात्म ज्ञान प्राप्त केले आहे. त्यांच्या सचोटीला व प्रामाणिकपणाला तोड नव्हती. त्यांचे अनेक जन्मांचे कल्याण झाले आहे हे निश्चित.

**वैद्यकीय व्यावसायिकः** दवाखान्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ठीक करण्याचा आम्ही प्रयत्न केला. डॉक्टर असल्यामुळे आम्ही आमचे शरीर तंदुरुस्त ठेवले होते. शरीराप्रमाणे आत्म्याचेही विकार असतात हे आम्हाला माउंट आबू येथील ब्रह्माकुमारीच्या मुख्यालयात गेल्यावर समजले. **त्याचबरोबर हे देखील समजले की आत्म्याचे विकार ठीक करणारा रुहानी सुप्रीम सर्जन केवळ परमात्माच आहे. त्याने ब्रह्माद्वारे निर्माण केलेले ब्रह्मावत्स हेच वास्तविक आत्म्याचे डॉक्टर आहेत. त्यांनी ज्ञान व योगाच्या आधारे अशांत व भटकणाऱ्या मानवी मनाला शांत केलं. विपरीत बुद्धीचे प्रीत बुद्धीत रूपांतर केलं.** फलस्वरूप निर्णय शक्ती प्रगल्भ झाली. कनिष्ट संस्कार नष्ट करून श्रेष्ठ संस्कारांचे बीजारोपण केले. अष्टशक्तींच्या आणि दिव्य स्मृतीच्या टॉनिकने आत्म्याला शक्तिशाली बनविले. अशाप्रकारे ब्रह्मावत्सांना त्या रुहानी सर्जनच्या मार्गदर्शनाद्वारे संपर्कात येणाऱ्या प्रत्येक आत्म्याला निर्विकारी अर्थात निरोगी केले. खरा निरोगी मानव तोच आहे, ज्याच्या शरीरात व आत्म्यात कोणताच विकार नाही. अशा निरोगी मानवाच्या अर्थात देवतांच्या युगात जन्म घेण्याची संधी मात्र आम्ही गमावली आहे.

**वकिल** : हा व्यवसाय करताना आम्ही केवळ भिन्न-भिन्न आशिलांची वकिली केली परंतु ईश्वरीय संदेश प्राप्त झाल्यानंतर परमात्मा ज्ञानाचा अभ्यास केला असता तर आम्ही त्या परमात्म्याचे वकिल होऊन तो सर्वव्यापी नाही, गीताज्ञानदाता श्रीकृष्ण नाही, स्वर्ग व नर्क अन्यत्र कोठे नसून त्यांचे अस्तित्व याच साकार सृष्टीवर असते, शिव आणि शंकर हे भिन्न आहेत, कोणीही देहधारी परमात्मा नाही, सर्व धर्मातील सर्व आत्म्यांचा पिता केवळ निराकार परमात्माच आहे, तसेच भारतीयांच्या मूळ धर्माचे नाव सनातन देवी-देवता आहे, हे सर्व मुद्दे सिद्ध करून आम्ही परमात्म्याचे वकिल होऊ शकलो असतो. परंतु अशी ही अलौकिक वकिली करण्याचे भाग्य आम्ही निर्माण केले नाही. ही वकिली आतापर्यंत ब्रह्मावत्सांनी मात्र यथार्थपणे केली आहे. जन्म-जन्मांतरीचे भाग्य कसे निर्माण करावे हे आम्ही ब्रह्मावत्सांकडून शिकून घ्यायला हवे होते. धन्य

आहेत ते ब्रह्मावत्स !

**शिक्षक, प्राचार्य, प्रोफेसरः** आम्ही विद्यार्थ्यांना जे शिक्षण दिले ते तर केवळ शरीर निर्वाहार्थ. आमचे विद्यार्थी भिन्न-भिन्न क्षेत्रात मोठ्या हुद्द्यावर आहेत यातच आम्ही धन्यता मानली. नैतिक शिक्षणाच्या अभावी मात्र काही माजी विद्यार्थ्यांनी आर्थिक भ्रष्टाचार केल्याचे समजले. जन्मजन्मांतरीचे श्रेष्ठ व चारित्र्यसंपन्न जीवन घडविण्याचे शिक्षण केवळ परमशिक्षक परमात्माच देऊ शकतो. आम्ही माउंट आबू येथील शिक्षकांच्या योगशिबीरालाही जाऊन आलो परंतु त्या भाग्यविधात्याला आम्ही यथार्थतः कधीच ओळखले नाही.

**उद्योगपतीः** मानवी जीवनाला उपयोगी असणाऱ्या मोठमोठ्या साधनांची निर्मिती आम्ही केली. परंतु ज्यावेळी थोडे फार परमात्म ज्ञान प्राप्त झाले त्यावेळी आम्हाला समजले की **अशरीरी परमात्मा तर सर्वश्रेष्ठ उद्योगपती आहे. तो कनिष्ठ मानवातूनच दिव्य मानवाची व दिव्य युगाची निर्मिती करतो. असे हे दिव्य उत्पादन करणारा तो एकमेव उद्योगपती आहे. त्याच्या आश्चर्यकारक फॅक्टरीत प्रथमतः ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारींची निर्मिती होते. या ब्रह्मावत्सांतूनच तो सत्ययुग, त्रेतायुगासाठी पवित्र व पूजनीय अशा चैतन्य देवी-देवतांची निर्मिती करतो.** ज्या देवतांची अतिशय सुंदर आणि नयनरम्य मंदिरे काही उद्योगपतींनी बांधली आहेत. ब्रह्माकुमारी विद्यालयातील भगिनींनी त्यांच्या कार्यक्रमासाठी आम्हाला आमंत्रित केले होते. परंतु आम्ही मात्र वेळ नसल्याचे सांगितले. कंपनीचा आर्थिक फायदा व कर्मचाऱ्यांची दैहिक पालना या दोन उद्देशांपोटी आम्ही आमचे कर्तव्य करीत होतो. कर्मचाऱ्यांच्या आत्मिक पालनेसाठी मात्र ब्रह्माकुमारी भगिनींचीच आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी सेल्फ मॅनेजमेंटसारखे कार्यक्रमही आयोजित केले होते, परंतु दुर्दैवाने त्याचा लाभ मात्र आम्ही घेऊ शकलो नाही.

**राजकारणी नेतेः** राजकारणाच्या कारकिर्दीत विरोधी पक्षांवर टीका करून आम्ही किती सच्चे व समाजकल्याण करणारे आहोत हे सांगण्याचा प्रयत्न केला. या राजकारणामुळे आम्हास अल्पकाळचे पद व अधिकार प्राप्त झाला. या कलियुगात कोणत्याही पदाची शाश्वती नसते. भ्रष्टाचारामुळे कुणाला कधी शिक्षा होऊन त्याची पदावनति होईल हे सांगता येणार नाही. वेळोवेळी आम्हास ब्रह्मावत्स बंधू-भगिनींनी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आमंत्रण देऊन परमात्म ज्ञान सांगताना ईश्वरीय उपहारही दिला होता. ज्ञानाच्या आधारे इतकेच सांगता येईल की सत्य परमात्मा संपूर्ण सत्याचे, कल्याणकारी व अंतिम राजकारण खेळणारा आहे. जे मनुष्यआत्मे त्याच्या श्रीमताप्रमाणे आचरण करून श्रेष्ठ बनण्याचा पुरुषार्थ करतील त्यांना भारताचेच नव्हे तर संपूर्ण विश्वाचे राज्यभाग्य निर्विघ्न आणि दीर्घ कालासाठी प्राप्त होईल. आम्ही मात्र शेवटपर्यंत कलियुगी राजकारणातच बद्ध झालो होतो. आम्ही या विद्यालयाचे विद्यार्थी न झाल्याने, सत्ययुग-त्रेतायुगाच्या राज्यकारभारात आमचे काहीच काम उरले नाही. हे दुर्दैव नव्हे काय?

**क्रिकेटीयरः** क्रिकेटने आम्हाला पैसा, वैभव, नावलौकिक इत्यादी सर्वकाही मिळवून दिले. फलंदाजीत एकाग्रता यावी म्हणून ब्रह्माकुमारींच्या एका सेवाकेंद्रातर्फे आम्हा खेळाडूंना राजयोग शिबीरासाठी आमंत्रित केले होते. ईश्वरीय ज्ञान व राजयोगाची विधी ऐकून आम्ही सर्वजण प्रभावित झालो. शिबीर समाप्त झाल्यानंतर एका ब्रह्माकुमार भाईंशी आम्ही बरीच चर्चा केली. ते म्हणाले, 'मित्रांनो, हे ज्ञान धारण करून त्याप्रमाणे पुरुषार्थ करणे म्हणजे एक प्रकारचा क्रिकेट खेळण्यासारखेच आहे. आतापर्यंत आपण सर्वजण जिस्मानी क्रिकेट खेळत आलो. परंतु हा रुहानी क्रिकेट कसा खेळावयाचा हे मी तुम्हाला सांगतो ते लक्षपूर्वक ऐका. मी आत्मा जीवनाच्या खेळपट्टीवर उभा असून एक संघर्षपूर्ण क्रिकेट खेळण्यासाठी दक्ष झालो आहे. माझ्या-समोर विकारांचे प्रतीक असलेला माया रावण अत्यंत फसवी गोलंदाजी करीत आहे. तो मला बाद करण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. त्याचे दहा क्षेत्ररक्षक माझा झेल घेण्यासाठी व मला धावबाद करण्यासाठी संधीची वाट बघून आहेत मी मारलेला पुरुषार्थाचा प्रत्येक चौकार व षटकार मज आत्म्याचा विजय आणि दहा क्षेत्ररक्षकांसहित त्या दुष्ट रावणाचा पराभव आहे. हा रावण मला सीमारेषेच्या आतच बाद करू शकतो. त्याच्याकडून बाद

होऊ नये म्हणून त्या रावणाचा प्रत्येक चेंडू मला सीमापार टोलवायचा आहे. या रुहानी खेळात शिवबाबा व ब्रह्माबाबा कोच म्हणून मज आत्म्याला मार्गदर्शन करीत आहेत. परंतु तेच या खेळाचे पंच देखील आहेत. रुहानी फलंदाजाला देहाभिमान आला तर तो क्लिन बोल्ड होऊ शकतो. क्रोधामुळे उंच उडालेला झेल रावणाचा एखादा क्षेत्ररक्षक घेऊ शकतो. काम-विकारामुळे यष्टीचित, लोभामुळे धावचित, मोहामुळे स्वयंचित तर अहंकारामुळे मी आत्मा रावणाकडून पायचित होऊ शकतो. **गोलंदाज रावणाचे प्रत्येक षटक (ओव्हर) षडरिपूंचे षटक आहे. हा रावण योगीजीवनाची खेळपट्टी खराब करण्याचा तर कधी बंपर टाकून जखमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु मी आत्म्याने योगकवच असलेले हेल्मेट घातले आहे. रावणाचा प्रत्येक बॉल मला काळजीपूर्वक खेळावयाचा आहे, त्याच-बरोबर १०८ रन्स करून मला नाबाद शतक साजरे करावयाचे आहे. मज आत्म्याची ही खेळी पाहून बापदादा तर खूष होतीलच परंतु रावणही मला वंदन करून माझे अभिनंदन करेल.** या रुहानी क्रिकेटच्या खेळातून बापदादा आम्हाला ना तेंडूलकर, ना गावस्कर, ना कपिलदेव बनविण्यासाठी आले आहेत, ते तर आम्हास सत्ययुगी देव बनविण्यासाठी आले आहेत.' अशा या रुहानी क्रिकेटची कॉमेंट्री ज्या क्रिकेटपटूंनी ऐकली होती त्यांना त्या कॉमेंट्रीची आठवण अंतिम समयी अवश्य येईल. त्यावेळी त्यांच्या मनात हेच विचार येतील की, जिस्मानी क्रिकेटमुळे रुहानी क्रिकेटला आम्ही पूर्णतः विसरून गेलो. ब्रह्मावत्सांनी मात्र हा रुहानी क्रिकेट खेळून वर्ल्ड कप जिंकला आहे.

**अभिनेतेः** आम्ही आमच्या अभिनय कौशल्याने गाडी बंगला, नोकर-चाकर, धनसंपत्ती व लोकप्रियता संपादन केली. लाखो रुपयांच्या कारमधून आम्ही फिरत होतो. परंतु ही शरीररूपी कार असून मी आत्मा त्यात ड्रायव्हर आहे हे मात्र कधीच बुद्धीत आले नाही. परंतु ज्यावेळी आम्ही या विद्यालयास भेट दिली त्यावेळी आत्मा व परमात्म्याचा यथार्थ परिचय प्राप्त झाला. आम्हाला हे देखील समजले की, आम्ही काम केलेल्या चित्रपटाप्रमाणेच हा मनुष्य सृष्टीचा चार भागातील एक बेहदचा ड्रामा अथवा चित्रपट आहे. एखादा चित्रपट कितीही वेळा पाहिला तरी त्यातील दृष्यांत, प्रसंगात आणि अभिनयात अंशमात्रही फरक पडत नाही. तद्वतच हा बेहदचा ड्रामा प्रत्येक कल्पात हुबहू पुनरावृत्त होत असतो. हदच्या चित्रपटात आम्ही हिरो व हिरॉइन म्हणून पार्टधारी आहोत परंतु बेहदच्या चित्रपटात मात्र प्रथमतः ब्रह्मा सरस्वती व त्यांच्यानंतर ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी यांचा हिरोहिरॉइनचा ८४ जन्मांचा पार्ट सत्ययुगापासून चारही युगात आहे. आमची ही प्रसिद्धी व अभिनेत्यांचा पार्ट केवळ कलियुगात एखाद्या दुसऱ्या जन्मापुरता असावा. मा. सुरेश ओबेरॉय यांनी मात्र या ईश्वरीय कार्यात सक्रिय भाग घेऊन हदचा अभिनेता व खलनायक हा बेहद नाटकातील नायकही होऊ शकतो हे दाखवून दिले. बाकी आम्ही सारे समाजाचे चारित्रिक पतन करणाऱ्या या मायावी दुनियेत इतके मग्न झालो होतो की बेहदच्या ड्राम्याचे ज्ञान प्राप्त होऊनही त्याकडे लक्ष देण्यासाठी आम्हास वेळच मिळाला नाही. हेच आमचे दुर्दैव म्हणावे लागेल. या बेहदच्या ड्राम्यात सर्वात सुदैवी ब्रह्मा, सरस्वती व ब्रह्मावत्स हेच आहेत कारण वर्तमान समयी पुरुषोत्तम संगमयुगातील त्यांचा हा विशेष पार्ट भारताच्या चारित्रिक उत्थानासाठी आहे.

**घरगृहस्थी व गृहिणीः** शिवमंदिरातील चित्रप्रदर्शनी पाहून आम्हास परमात्म अवतरणाचा संदेश मिळाला होता. त्यासंबंधीची काही पुस्तकेही विकत घेतली. त्या पुस्तकातून आम्हाला समजले की आत्म्याला पवित्र बनविण्यासाठी काम-क्रोधादि पाच विकारांचा त्याग करावयास हवा. भगवद्‌गीतेतही आम्ही वाचले होते की, काम, क्रोध, लोभ ही तीन नरकाची द्वारे आहेत. त्याचा त्याग करण्याऐवजी या विकारांनाच आम्ही घट्ट पकडून ठेवले होते. जर आम्ही निश्चय केला असता की, या विकारांचा त्याग आम्हाला करावयाचाच आहे तर ते शक्य झाले असते. त्याशिवाय आमच्या शेजाऱ्यांच्या प्रमाणे आम्ही ब्रह्माकुमारी विद्यालयात रोज गेलो असतो तर आमच्यासाठीही परमात्म्याने सत्ययुगी स्वर्गाचे द्वार उघडून ठेवले असते. परमात्मा सर्वात कल्याण-कारी आहे आणि तो आम्हाला स्वर्गसुख देण्यासाठी

# ‘प्रजापिता ब्रह्मा-एक अद्‌भूत जीवन रहस्य’ जगातील सर्वात मोठे पुस्तक आणि आध्यात्मिक मेळाव्याचे सचित्र सेवावृत्त

मुलुंड सेवाकेंद्राव्दारे ‘प्रजापिता ब्रह्मा -एक अद्‌भूत जीवन रहस्य ’या ऐतिहासिक रेकॉर्ड पुस्तकाचे विमोचन तसेच भारतीय संस्कृती व संस्कार आध्यात्मिक मेळाव्याचे आयोजन दि. २१ ते २८ एप्रिल २०१३ या कालावधीत करण्यात आले. ‘प्रजापिता ब्रह्मा -एक अद्‌भूत जीवन रहस्य ’ हे २४ पानी पुस्तक २८ फूट उंच व १८ फूट रुंद असून सुमारे १५०० किलो वजनाचे आहे. या पुस्तकाचे विमोचन राजयोगी ब्र.कु. बृजमोहन भाई (संपादक प्युरिटी) व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड चे भ्राता थॉमस बैन(लंडन) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. त्यांनी सांगितले की हे जगातील सर्वात मोठे पुस्तक असून त्याचे नाव ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड’ मध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. त्याचबरोबर वर्ल्ड अमेझिंग रेकॉर्ड चे अध्यक्ष भ्राता पवनकुमार सोलंकी यांनी सदर पुस्तकाला वर्ल्ड अमेझिंग रेकॉर्ड म्हणून सर्टिफिकेट दिले. सदर सर्टिफिकेट मुलुंड सबझोनच्या संचालिका ब्र.कु. गोदावरी दीदींना प्रदान करण्यात आले. अशा रीतीने या पुस्तकाचे ऐतिहासिक रेकॉर्ड झाले.

राजयोगी ब्र.कु. बृजमोहन भाईनी आपल्या भाषणात आत्मअभिमानी स्थितीने होणारे फायदे सांगितले. त्यांनी सांगितले की विश्वातील सर्व समस्यांचे निराकरण आत्मअभिमानी स्थिती आहे. मुलुंडचे आमदार सरदार तारासिंह यांनी आपल्या भाषणात सांगितले की प्रजापिता ब्रह्मा हे एक महान पुरूष होते. त्यांची शक्ती आजही संपूर्ण विश्वाला सुसंस्कृत बनवित आहे. ते पुढे म्हणाले की गोदावरी दीदी व लाजू दीदी यांच्या बाबतीत मी असा अनुभव केला आहे की त्या जे संकल्प करतात, त्यांना बाबांची मदत मिळते. फलस्वरूप त्यांना सदा सफलता प्राप्त होते.

या मेळाव्यात ब्र.कु. शिवानीबहेन ‘आंतरराष्ट्रीय स्पीकर’ या देखील सामील झाल्या होत्या. त्याच बरोबर या मेळाव्यात महिला सशक्तिकरण, पर्सनालिटी डेव्हलपमेंट कॅंप, ब्लड डोनेशन कॅंप, करियर गायडन्स वर्कशॉप, जॉब मेळा, हेल्थ व आय चेकअप कॅंप, कवी संमेलन, दक्षिण भारतीय व विदेशी पाहुण्यांसाठी स्नेहमीलन, उत्तर व पुर्व भारतीयांचे संमेलन, कच्छ गुर्जर व पटेल समाजासाठी स्नेहमीलन यासारखे लोकाभिमुख कार्यक्रम आयोजित करण्यात आले. फलस्वरूप करोडो आत्म्यांना ईश्वरीय संदेश प्राप्त झाला. विशेष म्हणजे सुशिक्षित बेकार तरूणांसाठी आयोजित जॉब मेळ्यात २१० तरूणांना नोकऱ्या देण्यात आल्या. त्यासाठी सुमारे २१ कंपन्यांनी विशेष सहयोग दिला. या मेळाव्यातील विभिन्न कार्यक्रमात अनेक विशिष्ट व्यक्ती सहयोगी बनल्या. फिल्म अभिनेत्री वर्षा उसगांवकर, सुप्रसिध्द अभिनेता रमेश देव, कलाकार

प्रमोद कांबळे, पद्मश्री विकास महात्मे, ब्र.कु. रानी (रेकॉर्ड होल्डर ग्रिनीज बुक), कार्यसम्राट भ्राता मनोज शिंदे, समाजरत्न नानजीभाई ठक्कर , भ्राता मगनभाई ठक्कर , भ्राता मनोज कोटक, ठाण्याचे माजी महापौर अनंत तरे, महापौर भ्राता हरिश्चंद्र पाटील, अभिनेत्री कुणिका लाल, आंध्र प्रदेशाचे माजी मुख्य न्यायाधिश डॉ. ईश्वरैया, ब्र.कु. करूणा भाई (मा.आबू) इत्यादी. मुख्य म्हणजे माउंट आबू हून आलेल्या 'पीस ऑफ माईण्ड'च्या टीम व्दारे मेळाव्यातील कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण करून करोडो लोकांपर्यंत आध्यात्मिक संदेश पोचविण्यात आला. या मेळाव्याचे सूत्र-संचालन मुलुंड, सबझोन संचालिका ब्र.कु. गोदावरी दीदी यांनी अतिशय उत्तम प्रकारे केले, तसेच डॉ. ब्र. कु. राजकुमार कोल्हे यांनी विशेष सहयोग दिला.



'भारतीय संस्कृति एवं संस्कार आध्यात्मिक मेळाव्या' चे उद्घाटन करताना राजयोगी बृजमोहन भाई, भ्राता श्याम जाजू, बी.के. गोदावरी दीदी, बी.के. योगिनी बहेन, बी.के. मीना



राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदींना 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' चे सर्टिफिकेट देताना श्री थॉमस बैन शेजारी बी.के. बृजमोहन भाई, बी.के. योगिनी बहेन




'हॅपिनेस इंडेक्स' या विषयावर बोलताना बी.के. शिवानी बहेन, शेजारी बी.के. मीरा, श्री सुरेश ओबेरॉय, बी.के. राजकुमार कोल्हे,



मुलुंड- 'स्पिरिचुअॅलीटी थ्रू ड्रॉइंग अॅण्ड पेंटींग' या वर्कशॉप मध्ये मार्गदर्शन करणारे श्रीमती जानकी वैद्य, श्री दिलीप वैती, श्री अमरदीप सावंत, श्री श्रेयस खानविलकर, डॉ. प्रो. राजकुमार कोल्हे, बी.के. रंजन बहन, बी.के. भारती बी.के. मीना- वर्कशॉपमध्ये प्राईज प्राप्त करणारे विद्यार्थी




मुलुंड- दक्षिण आणि मध्य भारतीय संमेलनात भाषण करताना बी.के. लाजवंती, श्री नयन भेदा, नगरसेवक श्री मनोज शिंदे, राजयोगिनी बी.के. संतोष दीदी, राजयोगिनी बी.के गोदावरी दीदी,



मुलुंड- 'वर्कशॉप ऑन थियेटर आर्ट' या कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना श्री अमरदीप सावंत, श्री प्रमोद पगारे, श्री नितीन जाधव, राजयोगिनी गोदावरी दीदी शेजारी डॉ. प्रो. राजकुमार कोल्हे, श्री भोजराज आणि श्रीमती श्रेया कुलकर्णी



कच्छ, गुजर, पटेल समाजाच्या स्नेहमिलन प्रसंगी दिप प्रज्वलन करताना बी.के. करुणा भाई, सोबत राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदी, समाजरत्न नानजीभाई ठक्कर, बी.के.मृत्युंजय भाई, बी.के.बाबूभाई



दक्षिण भारतीय तथा विदेशी पाहुण्याच्या स्नेहसंमेलन प्रसंगी भाषण करताना बी.के. दिव्या बहन(बोरीवली), स्टेजवर बी.के. लाजवंती बहेन, बी.के. लतिका बहेन, डॉ.प्रो. राजकुमार कोल्हे, राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदी, भ्राता दुबे, भ्राता जगजीवन तन्ना.




'हेल्थ ॲण्ड आय चेकअप कॅम्प' प्रसंगी उपस्थित डॉक्टर वर्गराजयोगिनी बी.के. गोदावरी दीदी, भ्राता विकास महाले (नेत्ररोग तज्ञ), डॉ.प्रो. राजकुमार कोल्हे



राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदींना 'वर्ल्ड एमेझिंग रेकॉर्ड' चे सर्टिफिकेट देताना भ्राता पवन सोलंकी, दादी विणा भाटिया, कु. वंदना शर्मा, भ्राता रेड्डी, बी.के. दीपक, भ्राता रमेश देव, डॉ.प्रो. राजकुमार कोल्हे, भ्राता गणेश जिंदाल, भ्राता कार्तिकेयन, भ्राता अनुराग आचार्य



ASIA BOOK OF RECORDS

CERTIFICATE

Prajapati Brahma Kumaris Ishwariya Vishwa Vidyalaya (India), created the biggest book titled 'Prajapita Brahma - A Unique Life Secret' of dimension 28 ft x 18 ft, weighing 1,500 kg, and consisting of 24 pages. It was released on April 21, 2013, in Mumbai, Maharashtra, India.

एशिया बुक ऑफ रेकॉर्ड सर्टिफिकेट



WORLD AMAZING RECORDS

WORLD RECORDS INDIA

CERTIFICATE

World's Largest Book

Rajyogini B.K. Godavaridevi, Incharge - Mulund Subzone of Brahma Kumaris, has created history by making largest book of 28 ft x 18 ft on the founder of Brahmakumaris "Prajapita Brahma a Unique Life Secret" in The Indian Culture & Values Spiritual Fair on Sunday 21st April 2013 at 6:00 pm at Shri Datta Krida Prabodhini Sankul, Mulund Goregaon Link Road, Mulund (W), Mumbai. This largest book contains 24 pages and the weight of the largest book is 1500 kg. Prin. Dr.B.K. Rajkumar M. Kolhe is the Chief Co-ordinator of this mega event. The event was supported by B.K. Deepak Harke & Ganesh Jindam is the designer of the largest book.

Founder - President
World Records India

वर्ल्ड अॅमेझींग रेकॉर्ड सर्टिफिकेट




मुलुंड- गाडी ओढताना बी.के. रानी बहेन (गिनीज बुक रेकॉर्ड होल्डर)




मुलुंड- नॉर्थ तथा ईस्टर्न भारतीय स्नेह संमेलन आणि राष्ट्रीय कवी संमेलनात भाग घेणारे श्री दुर्गेश दुबे, श्रीमती मंजुळा चौधरी, कु.जान्हवी राजकुमार कोल्हे, श्री सर्वेश मिश्रा, श्री अतुल ज्वाला, श्रीमती प्रेरणा ठाकरे, राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदी, डॉ. प्रो. राजकुमार कोल्हे, बी.के. विवेक, श्री मुकेश मोलावा, श्री ठाकुरदास लोहाना, बी. के. नवल किशोर



मुलुंड- 'महिला सशक्तिकरण' कार्यक्रमात भाषण करताना बी.के. सरला, श्री सुखवीर कौर, बी.के. दादी विणा भाटीया, राजयोगिनी बी.के. गोदावरी दीदी, अभिनेत्री वर्षा उसगांवकर, बी.के. कुंती, श्रीमती सुषमा देशमुख, बी.के. रायकवार, श्रीमती अर्चना मजुमदार.

# राजयोगाद्वारे तणावमुक्त जीवन

*-- डॉ.दिलीप कौंडिण्य, निवृत्त प्राध्यापक, सर जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.*

आज जीवन अतिशय तणावपूर्ण आणि धावपळीचे झाले आहे. माणसाची कामावर जाण्याची वेळ निश्चित असते, पण काम संपवून घरी परत येण्याची वेळ निश्चित नसते. पोलिसांविषयी विचार केला तर रात्र काय आणि दिवस काय, जेवणाची वेळ काय, झोपण्याची वेळ काय, चोवीस तास काय किंवा बहात्तर तास काय, सण काय किंवा सुतक काय; त्यांना कशाचेच भान ठेवण्याचे देखील भान उरत नाही. सर्वांकरिता जो सण असतो किंवा दिग्गज नेत्यांच्या दर्शनाची पर्वणी असते, असे सर्व काही पोलिसां-करिता दिवस-रात्रीचे मरण असते. काम देखील असे की कामात आनंद कसा मिळविता येईल हा एक यक्ष प्रश्न ठरेल. डॉक्टरदेखील वेळी-अवेळी काम करतात पण बरा झालेला रुग्ण व त्याचे नातेवाईक यांच्याकडून मिळणाऱ्या आशीर्वादामुळे मनाला एक वेगळीच उभारी आणि आनंद मिळतो. पोलिसांना मात्र रात्रं-दिवस शिव्याशापच मिळतात.

मानवाच्या मेंदूत परमेश्वराने दोन प्रकारचे केंद्रबिंदू दिलेले आहेत, १) रिवार्ड सेंटर २) पनीशमेंट सेंटर म्हणजेच पारितोषिक देणारे आणि सजा देणारे केंद्रबिंदू. माणूस जेव्हा कोणाला मदत करतो किंवा एखादे चांगले काम करतो तेव्हा रिवार्ड सेंटर उद्दिपित होते आणि मेंदू-तून रक्तात असे काही स्त्राव झिरपतात जे माणसाला अत्यंत प्रसन्न करून टाकतात (फिल गुड हार्मोन्स). याउलट काही वाईट कर्म केले किंवा वाईट विचार केला तर पनिशमेंट सेंटर उद्दिपित होते आणि तणावाच्या हार्मोन्सचा अंतर्गत स्त्राव सुरु होतो. वरकरणी माणूस सुखी आणि आनंदी वाटतो पण सदर स्त्राव शरीराला आतून पोखरून टाकत असतो. या स्त्रावामुळे अनेक प्रकारच्या तणावा-मुळे निर्माण होणाऱ्या व्याधी उपजतात आणि माणूस जराजर्जर होत-होत नरकवास भोगता-भोगता शेवटी अकालीच संपतो. मग कितीही पैसा असला, कितीही मोठा मंत्री असला आणि जागतिक सर्वात उत्कृष्ट डॉक्टर आणि औषधोपचार असले तरी काल-परवा पर्यंत अधिकार व पैशाच्या गुर्मीत हसत-खेळत विविध लीला करणारा माणूस काही महिन्यातच धरातलावरून नाहीसा होतो. मुख्य म्हणजे असा माणूस आपल्या डोक्यावर वाईट कर्मांचे खूप ओझे घेऊन मरतो. पुढल्या जन्मी मग अगदी जन्मल्यापासून त्याचे उरलेले भोग सुरू होतात. एखादी कैदाशिण आई त्याला बडवून बडवून ठार मारते. यातूनही वाईट कर्माचे ओझं संपलं नसेल तर पुन्हा दुसरा जन्म आहेच. काही धर्मात दुसरा जन्म नाही असे मानतात पण आज रिग्रेशन हिप्नॉसिस या तंत्राद्वारे वैद्यकियरित्या सिद्ध झाले आहे की, पुर्नजन्म निश्चित आहे. **त्यामुळेच ब्रह्माकुमारीज् यांच्या मुरलीच्या वर्गात साक्षात परमेश्वर वारंवार बजावितो, 'सर्वांकरिता, तुमच्या शत्रुकरिता देखील नेहमीच शुभभावना ठेवा आणि सतत शुभचिंतन करा. कर्मात आणि वाणीत तर सोडाच, मनात देखील आणि स्वप्नात देखील वाईट विचार आणू नका.'** मन नेहमीच पवित्र ठेवा. कारण एक म्हणच आहे मनी वसे ते स्वप्नी दिसे. वरकरणी अशी मनाची पवित्र स्थिती साध्य करणे, ते देखील आजच्या अतिशय नकारात्मक वातावरणात अशक्य वाटेल पण पिताश्री ब्रह्माबाबांच्या शरीराचे माध्यम घेऊन परमेश्वराने जी सहज राजयोगाची विधी सांगितली आहे, तिचा नियमित अभ्यास (साधना) केल्यास अशक्य-देखील शक्य होऊन जाते, असा माझा तब्बल १५ वर्षांचा अनुभव सांगतो. माझे सात असाध्य आजार दूर झाले म्हणजेच माझा ते आजार निर्माण करणारा कर्मभोग संपला असे मी मानतो.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुरलीतील महावाक्ये अशी असतात की ऐकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की त्याच्या मनात जो संशय होता तो दूर झाला, प्रश्न मिटला किंवा संसारात येणाऱ्या समस्येवर फारच सोपा व सोयीस्कर तोडगा मिळाला. याशिवाय राजयोग मेडिटेशन, ज्याचे माईण्डफुलनेस मेडिटेशन असे शास्त्रोक्त नामकरण झालेले आहे, निव्वळ पाच ते दहा मिनिटात शरीर व

मनाचे संपूर्ण शिथिलीकरण करून टाकते. (या स्थितीला सर हर्बर बेन्सन या अमेरिकन हृदयरोग तज्ज्ञाने 'बायोलॉजीकल रिलॅक्सेशन रिस्पॉन्स' आणि 'दि झोन' असे नाव दिले आहे.) या स्थितीत मेंदूतून सतत झिरपणारे तणावाचे स्त्राव बंद होतात आणि संजीवनी स्त्राव रक्ताभिसरणात मिसळायला लागतात. याउलट ताण-तणाव शरीरातील लिपीड (फॅटस्), शुगर व आयर्न्सचा आंतरिक समतोल बिघडवून टाकतो. मग यातून वारंवार आजारी पडणे, सर्दी खोकला होणे, रक्तदाब आणि डोकेदुखी किंवा ॲसिडिटी, डायबेटीज् (मधुमेह), हृदयरोग, डिप्रेशन होणे इतकेच काय विसरभोळेपणा (डिमेन्शिया) आणि कॅन्सर देखील होतो. याचे कारण तणावाचे स्त्राव शरीराची प्रतिकार शक्ती कमी करून टाकतात. यामुळे डेंग्यू किंवा हिवतापासारखे (मलेरिया) एकेकाळी सर्वसाधारण वाटणारे आजार विक्राळ आणि जीवघेणे रूप धारण करतात.

आज लठ्ठपणाची समस्या खूप वाढलेली दिसून येते खास करून लहान मुला-मुलींमध्ये. याचे एक महत्त्वाचे पण कित्येक डॉक्टरांना माहित नसलेले एक कारण आहे, तणावाचे स्त्राव 'हंगर सेंटर' आणि 'सटायटी सेंटर' यांच्यातून झिरपत असणाऱ्या स्त्रावांचा (घ्रेलिन व लॅप्टिन) समतोल बिघडवून टाकतात. ताण-तणावामुळे हंगर सेंटर नेहमीच उद्दिपित असते. त्यामुळे भरल्यापोटी देखील माणूस श्रीखंडाच्या चार-पाच वाट्या रिचवू शकतो. त्याशिवाय गोड खाल्ल्याने फिल गुड हॉर्मोन्स झिरपून ताण-तणाव थोडासा दूर होतो. सटायटी सेंटर तणावामुळे दबलेले असते ते जागृत होईपर्यंत माणसाने नको तितक्या प्रमाणात बरेच काही खाल्लेले असते. त्यात थंडा म्हणजे टॉयलेट क्लिनर, आईस्क्रिम, चॉकलेट, बर्गर, पिझ्झा वगैरे यांचे बेछूट सेवन यांची भर पडते.

**याउलट राजयोगाच्या अभ्यासाने संजीवनी स्त्राव समतोल निर्माण करतात. मग व्याधी होत नाहीत किंवा झाल्या असल्यास व्याधी दूर होतात. हे सदर संजीवनी स्त्राव म्हणजे सुप्रिम सर्जन परमेश्वराचेच रामबाण औषध आहे.** मेलाटोनिन हा स्त्राव निद्रानाशाचा विकार दूर करतो. ब्रेन डिराईव्हड न्युरोट्रॉफिक फॅक्टर किंवा बी.डी. एन्.एफ्., बुद्धिभ्रंश किंवा डिप्रेशन होऊ देत नाही. मनाचे सशक्तीकरण झाल्याने दुर्धर व्यसनातून सुटका होते, परिस्थिती किंवा आजूबाजूची माणसे कितीही वाईट वागत असली तरी माणूस खचत नाही किंवा खंगत नाही. नेहमीच सत्‌चित्‌आनंद स्थितीत राहतो. सहज राजयोग करीत असताना माझा आणि कित्येक लोकांचा असा अनुभव आहे की एक अनाकलनीय शक्ती जणू आसमंतातून शरीरात प्रवेश करीत आहे आणि शरीरात तिचा संचार होत आहे. ब्रह्माकुमार डॉ.चंद्रशेखर यांनी त्यांच्या एक आगळ्यावेगळ्या वैज्ञानिक प्रयोगाद्वारे या वैयक्तिक स्वरूपाच्या अनुभूतीला शास्त्रोक्त आधार दिला. युनीव्हर्सल स्कॅनर या यंत्राचा उपयोग करून ते शरीरातील कोणती शक्तीचक्रे अवरोधित आहेत हे आधी दाखवून देतात. नंतर ग्लासमधील पाण्याला ते फक्त एक ते तीन मिनिटाचा राजयोग करून चार्ज करतात. सदर पाणी प्याल्यानंतर ज्या शक्ती चक्रांमध्ये अवरोध होते, ते अवरोध दूर झाल्याचे या प्रयोगात दाखवितात. चार्ज केलेले पाणी प्यालानंतर आणि अवरोध दूर झाल्यानंतर शरीराच्या भोवती असणाऱ्या शक्ती वलयाचा परिघ (बॉडी ऑरा) लक्षणीयरित्या वाढल्याचे दिसून येते.

**तात्पर्य म्हणजे राजयोगाद्वारे परमपित्याशी आत्म्याचा संबंध जोडून मनःशक्ती वाढवा व सर्व प्रकारच्या दुःखातून, तणावातून मुक्त व्हा.** एक म्हणच आहे, 'मनाचा ताबा उत्तम ताबा आणि मनाची शक्ती तर सर्व ताण-तणाव व रोगांपासून मुक्ती मिळवून देते. राजयोग एकंदर १३७ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्रामार्फत मोफत शिकविला जातो. करून तर बघा, स्वतः अनुभव घ्या आणि खात्री करा.

❖❖❖

## आवश्यक सूचना

काही सेवाकेंद्राकडून 'अमृतकुंभ'ची सन २०१३-१४ ची मागणी अद्याप प्राप्त झाली नसल्याने, टीचर्स बहिणींनी ती फोन, ई-मेल वा पत्राद्वारे त्वरीत कळवावी. त्याचबरोबर वर्गणीची रक्कम शक्य तितक्या लवकर पाठवून ईश्वरी सेवेत सहयोग द्यावा. -- ***प्रकाशक, अमृतकुंभ.***

▶ पान क्र. २३ वर

▶ पान क्र. १६ वरून

आला आहे. याचा आम्ही कधी विचारच केला नाही. नरकीय सुखातच आम्ही समाधान मानले. फलस्वरूप ते स्वर्गीय सुख आम्हाला कधीच प्राप्त होणार नाही. केवळ असुरी गुणांमुळे आम्ही आमच्या दैवी भाग्याला कल्प-कल्प तिलांजली दिली आहे.

**देवतांचे भक्तः** अंतिम समयी भक्तांच्या मुखातून हेच शब्द बाहेर पडतील की हे ईश्वरा, अवतरणाचा संदेश प्राप्त होऊनही आम्ही तुझ्या अवतरणाला व महान कार्याला ओळखू शकलो नाही. **संतांनी दर्शविलेला भक्तिमार्गच सर्वश्रेष्ठ आहे, असे समजून त्या मार्गावर चालत राहिलो. हे भगवन, तू चर्तुभूज विष्णू, चक्रधारी श्रीकृष्ण, श्रीराम, श्री शंकर, श्री गणेश, श्री दत्तात्रय अथवा श्री हनुमानाच्या रूपात जरी आला असतास तरी सर्व भक्तांनी तुला ओळखले असते. परंतु तू साधारण रूपात का अवतरित झालास? हे भाग्यविधाता, तुझ्यापासून प्राप्त होणाऱ्या अलौकिक प्राप्तीला आम्ही कल्प-कल्प वंचित झालो आहोत.** आता पश्चात्तापाचे गरम अश्रू ढाळल्याशिवाय आम्ही काहीही करू शकत नाही.

**आध्यात्मिक गुरुः** आमची प्रतिष्ठा जपण्याकरिता तसेच शिष्य गणांची संख्या कमी होऊ नये म्हणून आम्ही परमात्म अवतरणाचा संदेश शिष्यांना कधीच दिला नाही. वास्तविक त्या सत्संगात गेल्याने मनुष्यआत्म्याचे जन्म-जन्मांतराचे कल्याण होते. त्या सदगुरू परमात्म्याच्या सत्संगात जाण्याचा सल्ला सर्व शिष्यांना द्यायला हवा होता. दुर्दैव तर हेच आहे की, उद्धारकर्त्या परमात्म्याद्वारे ना मी माझा उद्धार करू शकलो, ना माझ्या शिष्यांचा!

**शिष्यगणः** आमच्या गुरूंचे हे कर्तव्य होते की, त्या सद्‌गुरु परमात्म्याकडे जाण्यासाठी आम्हा शिष्यांना अनुमती देणे अति आवश्यक होते. परंतु आमच्या गुरूंनी परमात्म अवतरणाचा संदेशही कधी दिला नाही. त्या सद्‌गुरूच्या मिलनापासून आम्ही कायमचे वंचित राहिलो. आता उर्वरित अल्पकाळात परमात्म्याकडून सर्व प्राप्ती करवून घेणे जवळ-जवळ अशक्य आहे. हे भगवंता, परमधाममध्ये जाण्यापूर्वी आमच्यावर काहीतरी कृपा कर.

**अंधश्रद्धा निर्मूलकः** समाजातील घातक अंधश्रद्धा आम्ही दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्यासाठी यथार्थ श्रद्धेचे ज्ञान समाजाला द्यावे लागते ते मात्र आम्ही देऊ शकलो नाही. त्यासाठी जर आम्ही वेळीच ब्रह्माकुमारी संस्थेशी संपर्क साधून मी कोण आहे व परमात्मा कोण आहे, देवात्मा व परमात्मा यामधील अंतर कोणते आहे? संत महात्म्यांची भूमिका आणि परमात्म्याची भूमिका काय आहे? सद्‌गती दाता कोण आहे? आत्मा या साकार सृष्टीवर कोठून आला व कोठे जाणार आहे? इत्यादी परमात्म ज्ञानातील मुख्य मुद्दे समजावून घेतले असते तर प्रथमतः आमचीही अंधश्रद्धा दूर होऊन समाजातील प्रत्येक मानवाच्या अंतर्आत्म्यात यथार्थ दीप प्रज्वलित करता आला असता. परंतु हे कार्य करण्यासाठी आता कालावधीच पुरलेला नाही.

### ❒ धर्मस्थापक आत्म्यांचा अंतिम पार्ट

महाविनाशापूर्वी असलेल्या अत्यल्प काळात परमात्मा अवतरित झाल्यानंतर धर्मस्थापक इब्राहिम, गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त, महावीर जैन आणि गुरुनानक यांचे आत्मे जन्म-मृत्युच्या फेऱ्यात अंतिम शरीर धारण करून परमात्म्याला भेटण्यासाठी निश्चितपणे येतील कारण परमात्मा त्यांचा देखील पारलौकिक पिता आहे. त्यावेळी सर्व धर्मस्थापक आत्म्यांना ही पूर्णतः विस्मृती झाली असेल की आम्ही धर्मस्थापक आत्मे आहोत. ज्याप्रमाणे पिताश्री ब्रह्माबाबांना सत्ययुगातील त्यांच्या प्रथम जन्माची स्मृती प्रदान केली तद्वतच परमात्मा धर्मस्थापक आत्म्यांना त्यांच्या प्रथम जन्माची स्मृती प्रदान करेल. या स्मृतीच्या आधारेच धर्मस्थापक आत्मा त्याच्या निर्धारीत समयी आपला धर्म स्थापन करेल. ५,००० वर्षांच्या या विलक्षण ड्रामामध्ये कोणी, कधी आणि कोणता पार्ट बजावयाचा हे केवळ संगमयुगातच निश्चित होत असते. धर्मस्थापक आत्म्यांचे पार्ट अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्यांना स्मृतिस्वरूप बनविणे हे परमात्म्याचे अंतिम कर्तव्य आणि कदाचित अंतिम अवतरण असेल.

### ❒ अंतिम समयीचे दृश्य

लेखात आरंभी म्हटल्याप्रमाणे भिन्न-भिन्न साक्षात्कारातूनच परमात्म्याची प्रत्यक्षता होईल. रचयिता अव्यक्त असून त्याची रचना व्यक्त असते. अर्थात रचनेद्वारेच रचयिता परमात्म्याची प्रत्यक्षता होत असते. **महाविनाशापूर्वी पिताश्री ब्रह्माबाबा, जगत्‌अंबा सरस्वती आणि ब्रह्मावत्सांच्या फरिश्ता रूपांचा तसेच सत्ययुगातील त्यांच्या देवतापदांचाही साक्षात्कार होईल. त्याचबरोबर सत्य परमात्म्याचे अवतरण होणे ही विश्वातील सर्वात महान व परिवर्तनशील घटना असून तेच विश्वाचे अंतिम सत्य आहे. या महान सत्याला प्रत्येक मानवाच्या अंतःकरणातून मान्यता मिळेल. दाही-दिशातून एकच आवाज येईल 'हमारा बाबा आ गया'**. परमात्म ज्ञानाचे कडवे विरोधकही म्हणतील की ब्रह्मावत्सांनी तर आम्हाला विश्वाचे अंतिम सत्यज्ञान प्रदान केले होते. परंतु आम्ही परमात्म ज्ञानाचा उपहास केला. ज्ञान ऐकूनही दुर्दैवाने त्यावेळी आमच्या बुद्धीचा यथार्थ निर्णय झाला नाही. आता पश्चात्तापाशिवाय दुसरे कोणतेच कर्म आम्ही करू शकत नाही.

अशाप्रकारे संपूर्ण विश्वातच पश्चात्तापाच्या अग्नीचा भडका उडेल. काही मनुष्यआत्मे तर इतके रडतील की त्यांचे पाण्याचे अश्रू समाप्त होऊन त्यांच्या नेत्रातून रक्ताचे अश्रू वाहू लागतील. ज्या ब्रह्मावत्सांनी यथार्थ पुरुषार्थ केला नाही व आपले योगी जीवन व्यर्थ घालविले त्यांच्याही मुखातून हेच शब्द बाहेर पडतील की, बाबांनी वेळोवेळी मार्गदर्शन करूनही त्यांच्या श्रीमताप्रमाणे आम्ही आमचे जीवन बनविले नाही. आमच्याकडे वेळ असूनही तो आम्ही ईश्वरीय कार्यात सफल केला नाही. अटेंशन देऊन पुरुषार्थ केला असता तर आज पश्चात्तापाची वेळ आलीच नसती? तीव्र गतीच्या पुरुषार्थाची सतत जाणीव रहावी म्हणून मनुष्यआत्म्यांना जागृत करणारे पुढील गीत अवश्य श्रवण करावे. त्या संकेतयुक्त गीताचे बोल आहेत, '**कर्म करो ऐसे भाई तुम, पडे न फिर पछताना।**' (डिव्होशनल साँग ४/ए/२).

'हे समस्त प्रभू प्रेमींनो, अद्यापही वेळ गेलेली नाही. आता तुम्ही उर्वरित समयाला ईश्वरीय कार्यात सफल करा. अंतिम समयी या ज्ञान यज्ञात लोक करोडो रूपये देऊ करतील. कित्येकजण आपले राहते घरही देण्यास तयार होतील. परंतु त्यावेळी परमात्म्याचे कार्य संपन्न झाले असल्याने त्याचा अंशमात्रही उपयोग होणार नाही. **हे पारलौकिक पित्याच्या पारलौकिक वत्सांनो, जे काही तन, मन, धन ज्ञानयज्ञात सफल करावयाचे आहे ते तुम्ही आताच करा. ही सफलताच तुम्हास पश्चात्तापाच्या अग्नीपासून सुरक्षित ठेवताना तुमचे २१ जन्मांचे भविष्यही सुरक्षित ठेवील, याची मनोमन खात्री बाळगा. आता नाही तर कधीच नाही व कधीच नाही तर कल्पकल्पांतर नाही, हे घोषवाक्य बुद्धीरूपी फलकावर कायम कोरून ठेवा.** हे घोषवाक्य कुणासाठी किती कल्याणकारी आहे, हे या गुप्त पुरुषोत्तम संगमयुगातील तुमच्या कर्मावरच अवलंबून आहे.

## योगिनी मातेश्वरी

**ज्ञानवीणा धारिणी तू, योगिनी मातेश्वरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी।। धृ।।**
**गोड तुझिया सुस्वरांनी, भारल्या गेली मने।**
**तृप्त आत्मे जाहले, तव मधुर वीणा वादने।**
**तू जणू होतीस माते, योगेश्वराची बांसरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी।। १।।**
**ओम-राधे म्हणूनिया तुज, ओळखाया लागले।**
**मातृवृत्ती जाणुनी तव, प्रमुख तुजला नेमले।**
**सान कन्या, होय मम्मा, योजना ही ईश्वरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी।। २।।**
**शक्तिरूपा, सिद्धिस्वरूपा, जगत्‌जननी, अंबिका।**
**यज्ञमाता होऊनिया, पाळिले सर्व बालका।**
**आरती तव गात आहे, भक्त जन हे मंदिरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी।। ३।।**
**जूनच्या चोवीसला, अव्यक्त मम्मा जाहली।**
**या स्मृतीला वंदूनी सारे, वाहू या श्रद्धांजली।**
**अठ्ठेचाळीस वर्षे लोटली, विस्मृती ना अंतरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी।। ४।।**

***(संदर्भः ब्र.कु. गौतम सुत्रावे लिखित काव्यसंग्रह 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची').***

# वर्णमालेत गवसले जीवनमर्म

**(भाग - १३)** *ब्र.कु. डॉ.संजय माळी, पाचोरा.*

### ❒ 'एन फॉर न्यू' अर्थात नवा

मानवी मनाचं एक वैशिष्ट्य आहे की त्याला सतत नाविन्याचा ध्यास असतो. नवनवीन विचार, गोष्टी, संकल्पना जाणून घेण्यात त्याला विशेष रूची असते. बघा चित्रपटात मूळ कथानक सारखेच असते पण तेच वेगवेगळ्या प्रकारे दाखविण्यात येत असतं. तरच रूची टिकेल; नाही तर चित्रपट रटाळ वाटायला लागतील व कुठलाही दर्शक त्यासाठी वेळ खर्चणार नाही. प्रबोधन, रंजन व शोधन हे उद्देश एकाच वेळी साध्य झाले पाहिजेत मग मजा टिकून राहते. माणसाने हलक-फुलक होऊन अत्यंत आनंदात जीवन जगले पाहिजे. प्रत्येक क्षणाचा उत्सव साजरा करता आला पाहिजे तरच आम्ही अक्षय अविनाशी आनंद स्वरूपाला प्राप्त होतो.

नवी वस्तू कुणालाही पटकन आवडते. तसं **ब्रह्माबाबांनी आम्हाला नवा विचार दिला, 'वत्सांनो, नुसतीच देवाची पूजा करू नका. देव कसे बनले ते जाणून घ्या व तुम्ही पण देव बनायचा पुरुषार्थ करा.' बाबा म्हणाले, 'तुम्ही आत्मा पुज्य होता तुम्हीच पुजारी बनले आहात. देव बनणे फार कठीण नाही. स्वतःला आत्मा समजून त्या सृष्टि रचयिता शिव परमात्म्याची आठवण केली आणि सद्‌गुणी बनलात तर तुम्ही सुद्धा देव बनाल.'** जे सतत काहीतरी चांगले देत राहतात ते देवता बनतात. देवाचं ऐकलं की माणूस देवासारखा बनतो. देवाचं काम केल तरी माणूस देव बनतो. देवाला आपलं बनविलं तर त्याच्या साम्राज्यात राहावयास मिळते.

**नवा विचार - नवा आचार - नवा व्यवहारः** आपण शरीर नसून एक दिव्य चैतन्य आत्मा आहोत हा नवा विचार आहे. देवाची भक्ती तर आम्ही आजवर करीत आलो आहोत पण देव कसे निर्माण होतात याचे ज्ञान नव्हते. तो खुलासा बाबांनी केला की 'सर्व आत्म्यांचा पिता एकच परमात्मा आहे. त्याची आठवण करणे म्हणजे योग होय. अग्नीत कुठलाही पदार्थ शुद्ध होतो तसे योगाग्नित आत्म्याचे सर्व पाप भस्म होतात. पापमुक्त झालेले तुम्ही सर्व संपूर्ण पवित्र बनता. आपल्या परमपवित्र वृत्ती, स्थिती व दृष्टीने तुम्ही पवित्र कर्मांचे आचरण करता तेव्हा तुम्हीच देवी-देवता बनत असता.' दिव्यत्व जाणणे व दिव्य बनणे यालाच साधना असे म्हणतात.

**नवा आचारः** बाबा म्हणतात की आपल्या शुद्ध आचरणाने जगाला याची जाणीव करून द्या की यांना शिक्षण देणारा कुणीतरी अलौकिक असला पाहिजे. जगातील मानवांना जेव्हा हे कळेल की परमात्मा स्वतःच त्यांचा परम पिता, परम शिक्षक व सद्‌गुरु आहे, तेव्हा या विद्यालयात गर्दी मावणार नाही.

**अनोखे विद्यालयः** शिकविणारा शिव परमात्मा, शिकणारे ही विशेष आत्मे आहेत. पुढे तेच शालीग्राम रूपात पूजनीय बनतात. आहे ना गंमत. 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय' हे काही नुसते फॉलोअर्स बनविणारे विद्यालय नाही तर लीडर्स घडविणारे अलौकिक विद्यापीठ आहे.

असं म्हणतात की, Leadership is idealism in action. नेतृत्व हे आदर्श कृतीतूनच निर्माण होत असते. आदर्श विचार हेच आदर्श कृती व आदर्श नेतृत्व देऊ शकतात. आदर्श समाज घडवू शकतात.

**नवे आदर्शः** वर्तमानकाळात पिताश्री ब्रह्माबाबा, मातेश्वरी जगदंबा, दीदी मनमोहिनीजी, दादी प्रकाशमणीजी, दादी जानकीजी, दादी हृदयमोहिनीजी, दादी रतनमोहिनीजी, निर्वेर भाईजी, रमेशभाईजी तसेच अन्य वरिष्ठ दादी व भाई आमच्यासाठी आदर्श आहेत. ईश्वरीय ज्ञानाने त्यांनी आपले जीवन धन्य बनविले आहे.

**नवा अभ्यासक्रम :** भक्तिमार्गात आम्ही देवाची प्रार्थना करीत होतो पण जीवनाचे लक्ष्य काय आहे याचे यथार्थ ज्ञान मात्र आम्हाला नव्हते. आता बाबांनी नवा अभ्यासक्रम दिला आहे लक्ष्मी आणि नारायण स्वरूप बनायचा. सर्वगुण-संपन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, संपूर्ण अहिंसक, मर्यादा पुरुषोत्तम बनायचे आहे. त्यासाठी पुरुषार्थ करावयाचा आहे. रोज मुरली ऐकायची आहे आणि

जीवनात दिव्य गुणांचा मळा फुलवायचा आहे. शिव बाबा म्हणतात, 'मन्मनाभव' मंत्राचा अर्थ समजावून घ्या. स्वकर्म करीत असताना सतत माझ्या स्मरणात राहा. तुमचे कल्याण होईल यात शंका नाही.

**नवे विश्वविद्यालय** : ईश्वर एखादे विश्वविद्यालय स्थापन करून माणसाला देव बनायचे दिव्य शिक्षण देतो ही कल्पनाच मुळी सर्वांसाठी नवी आहे आणि हो, ईश्वराच्या मार्गदर्शनाने सत्ययुगी स्वर्गाच्या स्थापनेचे श्रेष्ठ कार्य येथे सुरू आहे. त्यासाठी परमात्मा एका मानव देहाचा म्हणजे ब्रह्माचा आधार घेतात व हे दिव्य ज्ञानामृत मानवजातीला प्राशन करवितात. देश-विदेशामध्ये याचे हजारो केंद्र आहेत. रोजच्या रोज परमपिता परमात्मा आपल्या बालकांना आदर्श बनविण्यासाठी मुरलीरूपाने ज्ञान देत आहेत. त्यांची आत्मिक स्मृती जागृत करीत आहेत. त्यांच्यामधील विशेषता रचनात्मक आणि विधायक कार्यासाठी उपयोगात आणत आहेत. योगबलाने नवीन पवित्र सृष्टी निर्माण होत आहे. जो आला तो रमला अशी येथील गोष्ट आहे. एकदा अवश्य भेट द्या म्हणजे येथील दिनचर्या आपल्या लक्षात येईल. या ईश्वरीय विश्वविद्यालयाचे विशेष विद्यार्थी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक संपादन करीत आहेत. विद्यालयाचे मानवी सेवाकार्य वेगवेगळ्या विंग्जच्या (प्रभागाच्या) माध्यमातून अखंडितपणे सुरू आहे.

**नवा अभ्यासः** आजवर गीता अनेकांनी श्रवण केली पण म्हणावे तसे जीवन परिवर्तन घडले नव्हते. आता मात्र व्यापक स्वरूपात परमेश्वरी कृपेचा अनुभव येत आहे. आता स्वयं परमात्मा शिव पिता, सत्य गीता ज्ञान देत आहे. फलस्वरूप आता जीवनाच्या परीक्षेत चांगल्याप्रकारे यशस्वी होऊन इतरांनाही यशस्वी बनविण्यासाठी मदत करण्यात या अनोख्या विद्यालयाचे विद्यार्थी म्हणजे ब्रह्माकुमार बंधु-भगिनी जीवन कष्टवित आहेत. विश्व-परिवर्तन, समाज-परिवर्तनाच्या दिव्य कार्यात ते कटिबद्ध असून संपूर्ण समर्पित आहेत. तेच या ज्ञानयज्ञाचे रक्षक आहेत. भगवंत सर्वांवर प्रेम करतात पण विशेष रूपात आपल्या आज्ञाधारक पुत्रांवर प्रेमवर्षाव करतात व त्यांच्या जीवनाला सुख, शांती, समाधान, ज्ञान व आनंदाने भरून टाकतात.

**स्वतःला आत्मा समजणे, परमेश्वराचे नित्य स्मरण करणे, रोज मुरली श्रवण करणे, निरंतर योगयुक्त होऊन राजयोगाचा अभ्यास करणे, ज्ञानियांच्या किंवा राज-योगींच्या सहवासात राहणे, शुद्ध आहार आणि सात्विक आचरण अंगिकारणे, सद्‌गुणांची धारणा करणे, तपस्वी बनणे, स्वपरिवर्तनाने विश्वपरिवर्तन घडवून आणणे. स्वतःच्या मनावर विजय प्राप्त करणे स्वराज्य अधिकारी आणि भविष्यातील विश्वराज्य अधिकारी बनण्याचे स्वप्न साकार करण्याचा प्रामाणिक पुरुषार्थ करणे. हा येथला अभ्यास आहे.** चांगला अभ्यास, चांगले मार्क्स् हे तर सारेच जाणतात. लोकपसंत, परिवार पसंत आणि परमात्म पसंत बनण्यासाठी प्रत्येकाला त्याग, तपश्चर्या आणि सेवा करण्याची आवश्यकता आहे. ज्ञान, योग, धारणा व सेवा हे या विश्व-विद्यालयाचे चार मुख्य विषय आहेत.

**नव्या सृष्टीची स्थापनाः** पवित्रता, सुख आणि शांतीने परिपूर्ण व भेदाभेद रहित नवयुगाच्या स्थापनेचे कार्य मागील ७६ वर्षांपासून अहोरात्र सुरू आहे. नव्या जगात कुणीच भ्रष्टाचारी नसेल, सर्वच श्रेष्ठाचारी असतात. कुणीही दुःखी राहणार नाही. शेळी आणि वाघ आनंदाने एकत्र नांदतात. प्रकृती पावन अर्थात पाच तत्व पावन त्यामुळे सर्वांची मनेही विकाररहित व पावन असतात. आपापल्या योग्यतेप्रमाणे पद प्रतिष्ठा प्राप्त होत असते.

**नवा मार्ग** : परमेश्वर प्राप्तीसाठी आजवर अनेकांनी अनेक मार्गांनी प्रयत्न केलेत. आता आम्ही राजयोगाच्या मार्गाने जात आहोत आणि अगदी खात्रीपूर्वक आम्ही सांगू शकतो की आम्ही ईश्वर पाहिला आहे व जाणला आहे. सत्ययुगी श्रेष्ठ देवपदाच्या प्राप्तीसाठी आमचा अनवरत पुरुषार्थ सुरू आहे. हो, आम्ही अगदी संतुष्ट आहोत, आम्हाला ज्ञान रूपात, आनंद रूपात, समाधान रूपात आणि शांती रूपात स्वतःचा परिचय भेटला आहे. आम्ही ब्रह्मावत्स त्याचा सदाकाळ अनुभव करीत असतो. माणसाला स्वराज्य अधिकारी अन् संपूर्ण निर्विकारी बनविणारा राजयोग आम्ही अभ्यासत आहोत. विश्व-महाराजन् बनण्यासाठी

आम्ही पुरुषार्थ करीत आहोत. आदर्श कर्म, निष्काम सेवा हाच आमचा बाणा आहे. आम्ही देवदूतच आहोत. आम्हीच शांतीदूत आणि सुखदाता सुखदेव आहोत. समस्त सृष्टीला पावन बनविण्यामध्ये आम्ही भगवंताची मदत करीत आहोत. आम्ही खुदाई खिदमतगार आहोत. सहजपणे योग लावणारे सहजयोगी आहोत. फक्त ज्ञानमोती वेचणारे मानसरोवराचे राजहंस आहोत.

**नवा सिद्धांत**ः ईश्वरी ज्ञानानुसार मनुष्य बीजापासून मनुष्य बीजाचीच निर्मिती होते. माणूस सृष्टीचक्रात ८४ जन्म घेतो. सत्ययुगात ८, त्रेतायुगात १२, द्वापारयुगात २१, कलियुगात ४२ आणि संगमयुगात १ जन्म घेतो. हा आमचा शेवटचा जन्म आहे. अशी आमची खरी मान्यता आहे. तसेच सृष्टीचक्र हे लाखो वर्षाचे नसून ते केवळ ५,००० वर्षाचे आहे. त्याची हुबेहुब पुनरावृत्ती होत असते.

**नवी कार्यपद्धती**ः इतके दिवस आपण कथा-कीर्तनांच्या, आख्यान-प्रवचनांच्या, माध्यमातून खूप उपदेश ऐकलेत. हो, अगदी खरे आहे, देवाबद्दल आम्ही खूप ऐकले आहे. परंतु देव बनायचा कधी प्रयत्न केला नव्हता. येथे आपल्याला आचरणाने हे दाखवून द्यायचे आहे की आम्ही देव बनत आहोत. नव्हे-नव्हे लोकांनी आमच्याकडे पाहून आश्चर्य व्यक्त करावे की कोण बरं ही चांगली माणसं. यांना हे शिकविणारा कोण असेल बरं. परमपित्याचे नाव उज्ज्वल करण्याची जबाबदारी आपली आहे. मुरलीतून बाबा हेच सांगत असतात.

**मुरली**ः जगायला नवे बळ देते. पाषाणबुद्धी असणाऱ्यांना परिसबुद्धी बनविते. मुरली हे आत्म्याचे टॉनिक आहे. दैनंदिन जीवनातील अनेक समस्यांचे समाधान आपल्याला मुरलीत मिळत असते, असा सर्वांचा अनुभव आहे. मुरली आत्म्यामध्ये ताकद भरणारे अलौकिक रसायन आहे. मुरली हे परमेश्वराने आपल्या लाडक्यांसाठी गायिलेले सुमधुर गीत आहे. आजारी आत्म्याला निरोगी बनविणारी संजीवनी बुद्धी आहे. मुरली हा तर इच्छिलेले प्राप्त करून देणारा कल्पवृक्ष आहे. मुरली ही इच्छापूर्ती करणारी साक्षात कामधेनु आहे. मुरली मन रमविणारे, ईश्वराच्या गावी घेऊन जाणारे विमान आहे.

**नवे वस्त्र**ः नवे कपडे सर्वांना आवडतात. आत्मा मलीन झाला आहे अनेक जन्मांपासून. आता बाबा आत्म्याची सफाई करण्यासाठी आलेले आहेत, आमच्या आत्म्याला नवे बनविण्यासाठी, ताजेतवाने बनविण्यासाठी, त्याचा थकवा दूर करण्यासाठी. पण भगवंताच्या समोर बसून जे मुरलीचे श्रद्धापूर्वक श्रवण, मनन करतात त्यांच्यासाठीच.

**नव्या युगात पदार्पण**ः रोज ज्ञान मुरली ऐकल्याने या भौतिक संसाराचा विचार व प्रभाव हळूहळू कमी होऊ लागतो. पूर्वी आम्ही स्वतःला एक शरीर समजत होतो. आम्ही एक आत्मा आहोत हे आता कळले आणि नित्य स्मरण केल्याने आमचा देहअभिमान नष्ट होतो. राज-योगाच्या अभ्यासाने आम्ही आत्मा स्वच्छ होतो. आम्ही हलके बनतो. लाइट-माइट आणि ब्राइट स्वरूप प्राप्त करतो. आपापल्या पुरुषार्थाप्रमाणे प्रत्येकाला कमी अधिक प्राप्ती होत असते. योगाभ्यासाने आम्ही चिदाकाशात विहार करणारे उडता पक्षी बनतो. स्वतः उडतो आणि इतरांनाही उडायला शिकवितो. जीवनातील ओझे नष्ट होते. कर्मबंधन नष्ट होतात. स्वानंदाची प्राप्ती होते. अनेकांचे दुःख दूर करण्याची अंतःप्रेरणा जागृत होते. प्रत्येक कामात बाबांची मदत मिळते.

**नवा मंत्र : 'मन्मनाभव' अर्थात अनेक देवांची आठवण न करता, केवळ एकाच परमपिता, परमशिक्षक, परमसद्‌गुरु परमात्म्याचे अंतर्मनात सतत स्मरण केल्यास आपण सुख शांतीचे अधिकारी होतो यात शंका नसावी. परमात्म्याचे दिव्यगुण जाणणे व त्यानुसार बनणे हीच जीवन्मुक्ती आहे. हा मंत्र आत्म्याची सद्‌गती करणारा आहे. ज्ञानमार्गात नुसता जप नसतो. त्याग, तप, संयम, धारणा यांच्या द्वारे सदा योगी बनून सदाशिव समान स्वरूपाला प्राप्त व्हायचे असते.**

**नवे तंत्र**ः प्रकृतीला योगबलाने पावन बनविले जात आहे. परमात्म्याच्या दिशा निर्देशाप्रमाणे सर्व कार्य सुरू आहे. येणारा भविष्यकाळ सर्वांसाठी अत्यंत उज्ज्वल मंगल आहे. आध्यात्मिक क्षेत्रात भारत जगत्‌गुरूची भुमिका निभावण्या-साठी सक्षम बनत आहे. सर्वांना सोबत घेऊन चालायचे

आहे. जे दीन-दुबळे अशक्त आहेत त्यांना सशक्त, कार्य-क्षम, उत्पादक व स्वावलंबी बनवायचे आहे. दु:खितांचे दु:खहरण करावयाचे आहे त्यांना शिव परमात्म्याच्या कृपाछत्राचा दिव्य लाभ घडवायचा आहे. ज्ञानरूपात सुख-कर्ता, दु:खहर्त्या शिव परमात्म्याची भेट घडवायची आहे. प्रशिक्षित आध्यात्मिक समाजसेवकांच्या फळ्या उभ्या झाल्या पाहिजेत. बाबा म्हणतात, 'विश्वाला सुख, शांती, प्रेम, आनंदाची दिव्य अनुभूती करविणारे तुम्ही महान राजयोगी आहात. तुमची प्रसन्नता इतरांना प्रसन्न करते. तुमची सेवा अनेकांना प्रेरणा देते. तुमचा त्याग नि तपस्या खरोखरीच अलौकिक आहे. तुम्ही करत असलेले कार्य आदर्शांचा इतिहास घडवित आहे. मानवतेची सेवा, समतेचा प्रसार, प्रेम शांतीचा विचार, जगताला नवजीवन देत आहे. प्रत्येक ब्रह्मावत्सात अनेकानेक शक्ती सामावलेल्या आहेत. नाना रूपांनी, नाना गुणांनी आणि नाना कौशल्याने विश्व-मानवाचे मन जिंकत दिव्यत्वाची अनुभूती तुम्ही देत आहात.' देवता बनणे आणि बनविणे याहून मोठे कार्य ते काय बरे असावे?

**नवजीवन** : राजयोगाच्या अभ्यासाने माणसाला खरोखरच नवजीवन प्राप्त होते. त्याच्या मनातील सर्व संशय मिटतात. अनुभव संपन्नता प्राप्त होते. माणूस सदाचारी व विवेकवान बनतो. सकारात्मक आयुष्य जगतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. आता जीवन मौज वाटू लागते. पूर्वी हेच जीवन ओझे वाटत होते. माणूस नवतेजसंपन्न ओजस्वी, उर्जावान आणि उत्साही बनतो. कर्मकुशलता प्राप्त होते. निरोगी काया व सशक्त मन विकसित होते. माणूस दु:खावर विजय मिळवितो. विकारांना जिंकू शकतो. अमूल्य वेळेचे महत्व लक्षात येते. आपला वेळ विधायक किंवा रचनात्मक परोपकारात खर्च करतो. माणूस समाधानी तसेच सुख-शांतीचा अधिकारी बनतो.

**नेव्हर नेव्हर नेव्हर गिव्ह अप अर्थात कधीच सोडू नका** : अनुभवी योगीजन म्हणतात की परमेश्वराचा हात कधीच सोडू नका. त्यांची शिकवण कधी विसरू नका. साधना करीत असताना अडचणी येतात, येऊ देत. अडचणींवर मात करा. **तुम्ही शिवशक्ती पांडवसेना आहात. विकारांना जिंकायचा पुरुषार्थ अर्धवट सोडू नका. देश-काळाचा विचार करून आदर्शासाठी काम करणे सोडू नका. भरकटलेल्यांना सन्मार्गावर आणा. आत्मिक बंधुत्व-भाव विसरू नका. नम्रता व इतरही दैवी गुण त्यागू नका. दैवी प्रेम त्यागू नका.**

प्रयत्न सोडू नका आणि ईश्वर प्राप्तीच्या प्रयत्नात आपण अनुत्तीर्ण झालो, असं कधी समजू नका. अर्थात प्रयत्न सुरूच ठेवा. आपण करीत असलेली ईश्वर प्राप्तीची साधना कधीच सोडू नका. शिक्षण सोडू नका तसेच शिकणे व शिकविणे ही सोडू नका. सत्य, सदाचार, न्याय, नीति, आत्मविश्वास कधीच त्यागू नका. चांगुलपणा व सन्मार्गाचा कधीच त्याग करू नका. आपण पाळीत असलेला संयम कधीच सोडू नका. आपण करीत असलेला परोपकार कधीच सोडू नका. चांगल्या कार्यात मित्रांना मदत करणे कधीच सोडू नका. मुरली श्रवण आणि राजयोग अभ्यास कधीच सोडू नका. ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न आणि जीवनाला फुलवायचा सत्पुरुषार्थ कधीच सोडू नका. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

**पत्थरसे पर्वत भरे, कोई न पूजा जाय।**
**पत्थरसे मूरत बने, तो जग का सिर झुक जाय।**

आपले हात आणि आपलीच कृती, आपणच घडवावी आपली सुंदर मुर्ती. शिव बाबा आमची स्मृती व दिव्य चेतना जागृत करीत आहेत. चैतन्य देव आहात तुम्ही. चैतन्य ठाकूरही (बाळकृष्णही) तुम्हीच आहात हे विसरू नका, हेच सार आहे. ❖❖❖

---

▶ पान क्र. ८ वरून

राहिलं पाहिजे. तसेच ज्या गोष्टींचा अभ्यास केल्याने आपली खुशी वाढत जाते, तो पुरुषार्थ केला पाहिजे. कारण आपली आंतरिक स्थायी खुशी हीच आपल्याला थोड्या कालावधीत संपन्न व संपूर्ण बनवू शकेल. सारांशाने पुढील काव्यपंक्ती सदैव लक्षात ठेवा -

**सदा खुश रहो, मुस्कुराते रहो।**
**खुशी का खजाना, लुटाते रहो।**
**गाते रहो, गुनगुनाते रहो।**
**मीलन प्यारे प्रभू से, मनाते रहो।**

# दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसति

*-- ब्र.कु प्रकाश तलाठी, विलेपार्ले (मुंबई).*

एखाद्या व्यक्तीने भर सभेत सर्वांसमोर तुमचा अपमान केला तर मनात राग उसळलेला असतानाही तुम्ही क्षणभरात तुमचा अपमान करणारी व्यक्ती तुमच्यापेक्षा हलक्या दर्जाची आहे की उच्च दर्जाची आहे हे आजमावता. जर ती व्यक्ती तुमच्यापेक्षा उच्च दर्जाची असेल तर मनात उसळलेला राग गिळून वरवर शांत राहता. भले वरून तुम्ही शांत असता परंतु अंतरात तुम्ही रागाने खदखदत असता. त्या सभेनंतर घरी परतताना तो प्रसंग तुम्ही जसाच्या तसा आपल्या मनाच्या पडद्यावर पुन्हा-पुन्हा अनेकदा पाहता आणि मनोमन निर्णय घेता की योग्यवेळी मी याचा वचपा जरूर काढेन. त्याला मी कोण आहे हे शिकवल्याशिवाय सोडणार नाही.

समजा, काही काळानंतर तुमचा एक विदेशी मित्र तुम्हाला भेटायला आला. त्याचा त्या व्यक्तीबरोबरचा अनुभव फारच चांगला होता. तुम्हा दोघामध्ये घडलेल्या घटनेची आणि तदनंतर तुम्ही केलेल्या दृढनिश्चयाची त्याला काहीच कल्पना नाही आणि त्याने आपल्या चांगल्या अनुभवाच्या आधारे त्या व्यक्तीची 'वाह वा!' करायला सुरूवात केली तर तुमची अवस्था कशी होईल?

तुम्ही नाराजीच्या सुरात काहीसे रागाने म्हणाल, 'तुला काही कल्पना नाही त्या व्यक्तीची. त्याचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे आहेत. तो असा आहे, तसा आहे म्हणून खतरनाक, नालायक आदी विशेषणासहित तुम्ही त्याची निर्भत्सना कराल. त्याच्या नुसत्या नावाच्या उल्लेखाने तुम्ही पेट घ्याल, जळाल! कदाचित त्याक्षणी ती व्यक्ती जगाच्या दुसऱ्या कोणत्यातरी ठिकाणी एखादी पार्टी एन्जॉय करत असेल आणि तुम्ही मात्र त्याच्या नुसत्या नामोल्लेखाने जळत आहात. कोण तुमचे आयुष्य चालवत आहे? कोण तुमच्या भावनांशी खेळत आहे? कोण तुमचे आयुष्य कंट्रोल करत आहे? तुम्ही की ती व्यक्ती? एखाद्या रिमोट कंट्रोलप्रमाणे तो तुमच्या भावनांशी एवढ्या दूरवरून खेळत आहे, तुम्हाला खेळवत आहे.

आता तुम्हीच ठरवा की तुम्हाला नेमकं काय हवे? तुमचा कंट्रोल तुमच्या हातात हवा की दुसऱ्याच्या हातात देणे तुम्हाला पसंत आहे? ती व्यक्ती, तो प्रसंग आठवून जळणे पसंत आहे की आनंदात राहणे पसंत आहे? शिवाय त्या जळण्यात तुमच्या शरीरातील नाजुक अवयवांना हानी पोचते म्हणजे स्वतःचे स्वास्थ्य आणि आनंद या गोष्टी तुम्हाला हव्यात की बदला घेण्याचे समाधान! **जर सुख-शांती-आनंद पसंत असेल तर मी म्हणेन स्वतःवर दया करा आणि झाले गेलेले विसरून जा. कारण विसरून गेलात, पुन्हा-पुन्हा आठवणी काढत बसला नाहीत तर स्वास्थ्य आणि आनंद दोन्हीची प्राप्ती होईल**. परंतु ज्याने मला इतक्या यातना दिल्या त्याला मी कसा विसरू?

समजा, त्या अपमानानंतर काही काळाने तुम्ही दोघे पुन्हा एका पार्टीत एकत्र आलात आणि त्या व्यक्तीने सर्वांसमोर तुमची जाहीर माफी मागितली की, भल्या गृहस्था, त्या दिवशी मी मद्याच्या धुंदीत बेजबाबदारपणे वागलो आणि तुमचा अपमान केला. मला नंतर पश्चात्ताप झाला परंतु भेटण्याचे धाडस होत नव्हते. कृपया मला माफ करा. तुम्ही काय कराल? तुम्ही त्याला म्हणाल, ठीक आहे. जातो कधी-कधी तोल माणसाचा! आणि उदार मनाने माफ कराल. दोघे एकमेकांना मिठीसुद्धा माराल. यानंतर तुम्ही अपमानाची घटना सहजपणे मागे टाकून स्वतःची जळण्यापासून सुटका करून घ्याल.

समजा तुम्हा दोघांची भेट एखाद्या पार्टीत झाली नाही परंतु एके दिवशी ती व्यक्ती तुमच्या ऑफिसमध्ये आली व जड अंतःकरणाने मनापासून झालेल्या घटनेबद्दल त्याने तुमची माफी मागितली. तुम्ही काय कराल? जाहीर अपमान व खाजगी रितीने माफी? तरीही तुम्ही माफ कराल आणि स्वतःला वेदना देण्यापासून मुक्त कराल म्हणजे ती घटना विसरण्यासाठी तुम्हाला काय पाहिजे आहे? त्याची माफी!

समजा, त्याने माफी मागितलीच नाही तर? आपण काय आयुष्यभर जळायचे काय? What is the way

out? **असे समजा त्याने माफी मागितली आणि तुम्ही विसरून गेलात. याला Forgive & Forget म्हणतात किंवा Let Go म्हणतात. जाऊ देण्यात मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य आहे. Hold On करण्यात केवळ जळणे आहे. हे सगळं बुद्धीला पटते परंतु प्रत्यक्षात आणणे कठीण वाटते.** कळते पण वळत नाही. माफ करणे एवढे कठीण का? कारण आपण केलेला दृढनिश्चय! वचपा काढल्याशिवाय, धडा शिकविल्याशिवाय चैन भरलेला श्वास घेणार नाही. बदल्याची भावना, शिक्षा दिल्याचे समाधान तुम्हाला हवे आहे.

पहा, तुम्ही माफी दिल्याने त्या व्यक्तीने केलेले चुकीचे कृत्य माफ होणार काय? नष्ट होणार आहे काय? मुळीच नाही. कोणीतरी त्याच्याशी अधिक खराब वागेल किंवा ज्या गोष्टीमुळे त्याला उन्मत्तपणा आलाय, सत्तेचे स्थान, अंदाधुंद संपत्ती नष्ट होऊन त्याला पुन्हा पृथ्वीवर आणेल, त्याने केलेल्या गैरकृत्याची शिक्षा त्याला मिळणार हे निश्चित. परंतु ती शिक्षा देणारे तुम्ही नसाल. दुसरा कोणीतरी असेल. परंतु त्याला शिक्षा व्हावी, त्याने धडा घ्यावा ही तुमची इच्छा पूर्ण होणार. मग आतातरी त्याला माफी करण्यास काय हरकत आहे? माफ करा आणि स्वतःला मुक्त करा.

**आदल्या रात्री ज्याच्याबरोबर येशू ख्रिस्ताने भोजन घेतले त्यापैकी एकाने जाऊन फितुरी केल्यामुळे येशू ख्रिस्ताला सुळावर चढून मरणाच्या अनंत यातना आणि वेदना भोगत मृत्युला कवटाळावे लागले. परंतु तरीही त्याने सूडाची-बदलाची भावना न बाळगता, परमेश्वराजवळ त्याची वकिली केली, ते अज्ञानी आहेत, त्यांना माफ कर. फलस्वरूप इतिहासात त्याचे नाव सुवर्णाक्षरात धर्मस्थापक म्हणून नोंदवले गेले. गेली २,००० वर्ष मानव त्याची महिमा गात आहे.**

बदला घेण्यात मोठेपणा नाही, बदलून दाखवण्यात मोठेपणा आहे. माफी केल्यानंतर आपण खरोखर झालेली घटना विसरून जातो काय? नक्कीच नाही. प्रत्येक घटना प्रत्येक प्रसंग एवढेच नव्हे तर प्रत्येक विचार अगदी व्यर्थ विचारसुद्धा आपल्या अंतर्मनात नोंदला जातो. Erase होत नाही, delete होत नाही म्हणजे जी अपमानास्पद घटना एकदा होऊन गेली ती माफ करूनही नष्ट होणार नाही, परंतु? परंतु आता ती आठवली तरी दुःख देणार नाही. म्हणूनच दुसऱ्यांना माफ करा आणि विसरून जा (Forgive & Forget).

जेव्हा मन मनमानीच करते आणि करू नये ते कृत्य आपण करून चुकतो. तेव्हा आपल्यालाच आपली लाज वाटते. मन खायला लागते. नजर खाली झुकते. सत्याच्या नजरेला आपण नजर देऊ शकत नाही. आपण आपल्या मनाला दुषणे देऊ लागतो. फिल्मी गीतांमध्ये 'पापी मन मोरा...' अशी गाणी लिहिली जातात. मनाला पापी म्हणणे, मनाला दुषणे देणे हे बरोबर नाही. मन एखाद्या लहान मुलासारखे असते, विशेषतः अंतर्मन (sub-concious). त्याला दटावल्यानंतर ते अढी धरते आणि reserve बनते. मोकळेपणाने वागत नाही.

वास्तविक मन ही एक सृजनशील शक्ती आहे. Creative Energy आहे. आपण त्याच्या सृजन-शीलतेला मुकतो. एखाद्या प्रश्नाची विविध अंगे मन दाखवू शकते. एखाद्या प्रश्नाची उकल करण्यासाठी अनेक पर्याय मन सुचवू शकते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी बिकट प्रश्नांची उकल करण्याची सूचना अंतर्मनाला द्या आणि मस्त झोप काढा. रात्रभर अंतर्मन मात्र जागृत राहून विचार करून दुसऱ्या दिवशी तुम्हाला मार्ग दाखवेल. अशा मनाची अवहेलना करणे योग्य नाही, हितकारक नाही.

शांती हा मनाचा खुराक आहे. शांत मन सृजनशील असते. अशांत मन, क्रोध किंवा तणावाखाली असते. त्यामुळे ते सृजनशील नसते. Relaxation of mind किंवा मनाच्या स्वास्थ्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. योगी, तपस्वी व्यक्तीचे मन सर्वाधिक सृजनशील असते. मनाचे संकल्पच योगी व्यक्तीला स्थळ काळाच्या बंधनातून, देहाच्या दुनियेच्या बंधनातून मुक्त करून परमपिता परमात्म्याच्या भेटीला घेऊन जाऊ शकते. अशी मन ही उत्कृष्ट सृजनशील शक्ती आहे.

एकंदरीत जेव्हा बाब दोघांमधील असेल तेव्हा माफ करा व विसरून जा (Forgive & Forget) व फक्त

▶ पान क्र. ३२ वर

# ब्राह्मण जीवनाची वैशिष्ट्ये

*ब्र.कु.मिनल, ठाणे (पश्चिम).*

समस्त विश्वातील मानव, परमपिता परमात्म्याला मानतो. परंतु तो कोण आहे? त्याचे स्वरूप, गुण, कर्तव्ये तसेच त्याचे श्रीमत काय आहे? आपला व त्याचा संबंध काय आहे? हे ओळखणारे थोडे आहेत. त्यातही त्याची यथार्थ ओळख करून घेऊन, त्याच्याशी संबंध जोडून संपूर्ण प्राप्ती करून घेणारे तर फारच थोडे आहेत. या संगमयुगी ब्राह्मण जीवनाचे मला जाणवणारे प्रथम वैशिष्ट्य म्हणजे स्वतःची अचूक ओळख पटणे. तसेच आपल्याला संपूर्ण सृष्टिचक्राचे ज्ञान असल्याने, आपण आदि काळात काय होतो, मध्य काळात काय होतो, आता अंतकाळी काय आहोत व भविष्यात काय बनणार हे सर्व आपण जाणतो.

मुख्य म्हणजे वर्तमानकाळी आपलं ब्राह्मण जीवन एखाद्या अमूल्य हिऱ्याप्रमाणे सुंदर, श्रेष्ठ बनलं आहे याचीही सहज स्मृती आपल्याला, सदैव असणं हे ब्राह्मण जीवनाचे पहिले वैशिष्ट्य आहे.

दुसरे वैशिष्ट्य आहे पिता परमात्म्याला ओळखून त्याच्याशी संबंध जोडणे. सत्ययुगातील देवी-देवतांना सर्व सुखांची प्राप्ती आहे. परंतु थेट ईश्वराशी संबंध जोडून अलौकिक अशा अतींद्रिय सुखाचा अनुभव प्राप्त करणं फक्त संगमयुगी ब्राह्मण जीवनातच शक्य आहे. भक्तिमार्गात कुणी शास्त्र वाचून, कुणी गंगा स्नान करून तर कुणी चारधाम यात्रा करून परमेश्वर प्राप्तीची अपेक्षा बाळगतात. परमात्मा शिव पिता सांगतात की 'जशी भावना असेल तशी इच्छापूर्ती मी करतो. पण जप, तप, यज्ञ अशा कष्टप्रद मार्गांनीही माझी प्राप्ती होत नाही. माझी सत्य ओळख भक्तिमार्गात कोणालाही होत नाही.' असं असताना विचार करा की आपण असे कोणते श्रेष्ठ कार्य केले म्हणून शिवबाबांनी आपल्याला वारस म्हणून निवडले? आपण फक्त मनापासून म्हटले 'मेरा बाबा' व आपल्याला ब्राह्मण जीवनात ईश्वरीय सुख प्राप्त झाले. आपल्या सत्य आत्मिक स्वरूपाची आठवण सतत ठेवा. आपल्या ब्राह्मण जीवनासारखे दुसरे अमूल्य जीवन नाही, हा आंतरिक ईश्वरी नशा सदैव बाळगा.

परमेश्वराला ओळखल्याने रचयिता व रचनेच्या आदि, मध्य, अंताचे सत्य ज्ञान प्राप्त होते. धार्मिक ग्रंथामध्ये ईश्वराची स्तुती आहे पण त्यातून त्याची खरी ओळख होत नाही. त्यामुळे त्याचा शोध घेताना माणूस अगदी थकून जातो. आता विचार करा आपण किती भाग्यवान आहोत! प्रत्यक्ष परमेश्वराची वाणी, मुरली आपण रोज ऐकतो. त्यातील सर्वश्रेष्ठ, सुंदर, सत्य असं एक-एक ज्ञान रत्न लाखो रुपयांचं आहे. भले कुणाकडे अरब, कोटी रुपये असोत परंतु साधारण ब्राह्मण मुलांना जे अतींद्रिय सुख प्राप्त आहे, ते इतर कोणालाही नाही. हे ब्राह्मण जीवनाचे वैशिष्ट्य आहे.

ज्ञानप्राप्तीनंतर ब्राह्मण जीवनात महत्वाची गोष्ट आहे पुरुषोत्तम संगमयुगाची ओळख. सांप्रत समयी दृष्टी, वृत्ती, कृती कशी असावी, धारणा काय असावी, याचे चिंतन केल्याने, शिवबाबांच्या मुख्य शिकवणूकींची आयुष्यात स्वाभाविक धारणा होऊ लागते. ब्राह्मण जीवन म्हणजे पवित्र जीवन. **ज्याप्रमाणे मस्तकावरील मुकुटात मौल्यवान हिरा सर्वोच्च स्थानी विराजमान असतो त्याचप्रमाणे आपण सर्व ब्राह्मण आत्मे प्राणेश्वर बापदादांच्या मुकुटातील सर्वश्रेष्ठ कोहिनूर हिऱ्याप्रमाणे आहोत. ब्रह्मावत्सांच्या मुखावरील तेज व स्मितहास्य इतरांमध्ये पहावयास मिळणार नाही. परंतु यासाठी हवी काया, वाचा, मने, व्यवहार तसेच भोजनामध्ये पवित्रतेची धारणा**. ती नसेल तर आयुष्यात नेहमी प्रसन्नता राहणार नाही. ज्ञानाच्या आधारे आपण जाणतोच की ही धारणा आपण प्रत्येक कल्पात केली आहे. जर आता काही उणीव राहिली तर त्याचा परिणाम निश्चितच आपल्या भविष्यावर होईल.

अंतर्मुख होऊन जर विचार केला तर जाणवते की शिवबाबांचा मुलांवर किती निश्चय आहे. ते सांगतात की 'प्रत्येक कल्पात हीच माझी मुलं आपला ईश्वरी वारसा हक्क मिळवतात. पवित्र बनून मला (ईश्वराला) प्रत्यक्ष करतात.' २१ जन्मांकरिता संपूर्ण सुख, शांती, संपन्नतेचा,

राज्यभाग्याचा हा ईश्वरी जन्मसिद्ध अधिकार प्राप्त करण्यासाठी पवित्रतेचा मूलभूत संस्कार धारण करू या. शांती, प्रेम, पवित्रता या गुणांच्या धारणेच्या अभावामुळे भक्तिमार्गात ६३ जन्म आपल्याला पुजारी बनून मस्तक झुकवावे लागले. परंतु आता मात्र शिवबाबांची शुभ आशा आहे की माझ्या मुलांनी डबल सिरताज (दुहेरी मुकुटधारी) बनावे. अशी पालना करणारे शिवबाबा विश्व कल्याणकारी, सर्वांचे हित जपणारे आहेत. भक्तिमार्गात भक्तगण सोमनाथ, अमरनाथ, हरिद्वाराची यात्रा करतात परंतु **खरं तर मधुबन हे सर्वात अलौकिक असे तीर्थस्थान आहे. जेथे आत्म्यांचे परमात्म्याशी परमपावन मीलन होते. याचेच गायन केले जाते - 'आत्मायें परमात्मा अलग रहे बहु काल। सुंदर मेला कर दिया जब सद्‌गुरु मिला दलाल।'**

ब्राह्मण जीवनातील मुख्य कर्तव्य आहे - ज्ञानमुरलीचे श्रवण, पवित्रतेची धारणा करणे व करविणे, दिव्य गुणांची धारणा, ज्ञानदान करणे, शिवबाबांच्या आठवणीत राहून इतरांनाही स्मृती देणे. यासारखी विशेषता ब्राह्मण जीवना व्यतिरिक्त कुठेही नाही. बाबांच्या महावाक्यांनुसार दररोज आठ तासांच्या योग अभ्यासामुळे कर्मातीत अवस्था होईल. त्यामुळे राजऋषी बनून अशा प्रकारचा योगाभ्यास प्रत्येकाने करायला हवा.

आत्मिक स्मृतीत राहून शिवबाबांशी योग लावल्याने जी शक्तिशाली स्थिती बनते तसेच स्वतःच्या विश्व कल्याणकारी स्वरूपाची जाणीव होते, त्याचा आनंद काय वर्णावा! हजारो ब्रह्मावत्स असे एकाच शक्तिशाली संकल्पात स्थित होतात तेव्हा विचार करा किती शक्तिशाली, योगयुक्त वातावरण बनत असेल! आपण ब्राह्मण सत्ययुगी दुनियेच्या स्थापनेकरिता निमित्त आहोत. विश्व सेवाधारी, विश्व कल्याणकारी अशी शिवबाबांनी दिलेली विशेषणं आपण प्रत्यक्षात आपल्या जीवनात आणायला हवीत.

ब्राह्मण जीवनाची श्रेष्ठ स्मृती सदैव असेल तर कमळाप्रमाणे स्वच्छ आणि विकारांपासून अलिप्त जीवन अनुभवास येईल. ज्यावेळी एखाद्या मायारूपी विकाराचा आघात होतो, त्यावेळी साक्षी होऊन बघा. त्यासाठी एकच कारण दिसेल ते म्हणजे ब्राह्मण जीवनाचे विस्मरण. अशावेळी लगेच स्वतःला आठवण करून द्या की मी कोण? माझ्या जीवनाचे वैशिष्ट्य तसेच कर्तव्य काय आहे? स्वतःतील गुण, वैशिष्ट्ये पुन्हा आठवा. स्वतःचा चार्ट काढून बघा.

संगमयुगातील एक-एक सेकंद परत येणार नाही व आता आपण जसा पुरुषार्थ करू तसाच तो प्रत्येक कल्पात होणार आहे. मला श्रेष्ठ पदाचा वारसदार व्हायचं आहे, असा निश्चय सदैव ठेवला पाहिजे. स्मृतीचा स्वीच सदैव ऑन (जागृत) असला पाहिजे. त्यासोबत आपण विश्वातील सर्व आत्म्यांसाठी सुख-शांतीची किरणं (सर्च लाइट) देत राहिलं पाहिजे. अंत समयीची भयानक दृष्ये पाहण्यासाठी आंतरिक तयारी हवी, वैराग्य हवं. 'मी मास्टर सर्वशक्तिवान आत्मा शिवबाबांचा लाडका मुलगा आहे' हा अभ्यासच आपल्याला अंतकाळी उपयोगी ठरेल.

आता आपण शिवबाबांचे वारस बनल्यामुळे, आपले ८४ जन्म किती श्रेष्ठ आहेत, ते पटत. आपण किती भाग्यवान आहोत, म्हणून असं श्रेष्ठ ब्राह्मण जीवन आपल्याला लाभलं! अशा ब्राह्मण जीवनातील सुखांचं, वैशिष्ट्यांचं नेहमी स्मरण करायला हवं व सदैव शिवबाबांचे आभार मानायला हवेत. ❖❖❖

---

▶ पान क्र. ३० वरून

आपल्यापुरती मर्यादित असले तेव्हा माफ करा परंतु विसरू नका (Forgive but not Forget) याचा अवलंब करा. एकदा प्रेसिडेंट नेल्सन मंडेला यांना टी.व्ही. इंटरव्ह्यूमध्ये विचारण्यात आले की तुमच्या विरुद्ध कारस्थाने करून तुम्हाला तुरुंगात डांबण्यात आले, अशा कारस्थानी लोकांना माफ करणे, तुम्हाला हातात सत्ता येऊनही कसे शक्य झाले? तेव्हा त्यांनी उत्तर दिले, 'मी खूप काळ तुरुंगवासात काढला. मला आता आणखी दुसऱ्या तुरुंगात रहायचे नाही. जर मी त्यांना माफ केले नसते तर मी स्वतःला मनाच्या तुरुंगात टाकले असते. झालं गेलं गंगेला मिळालं असे समजून माफ केल्यामुळेच मला स्वातंत्र्याची मौज लुटता आली.' **यावरून हे स्पष्ट होईल की दुसऱ्याला क्षमा करणे व विसरून जाणे, हे जणू टाकीचे घाव सोसण्यासारखे आहे. हे घाव सोसल्यानेच आपल्या अंगी देवपण येते. म्हणूनच म्हटले जाते, 'दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसति'.** ❖❖❖




**कल्याण :** पहिल्या महिला रेल्वे ड्रायव्हर सुरेखा यादव तसेच पहिल्या महिला लोकल ट्रेन असिस्टंट ड्रायव्हर संगीता सरकार यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर त्यांच्या समवेत ब्र. कु. अल्का व स्नेहा बहेन.



**सोलापूर :** महिला सुरक्षा अभियानास संबोधित करताना राजयोगिनी सोमप्रभा बहेनजी, सोबत डॉ. प्रतिभा पाटील, महापौर अलका राठोड, पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील, ब्र. कु. डॉ. वैशाली, माजी आमदार विनायक पाटील व अन्य.




**जयसिंगपूर :** खासदार राजू शेट्टी यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना बी. के. रानी बहेन.



**वसई :** 'मनाच्या व्यवस्थापनातून परिणामकारक शिक्षण' या विषयावर शिक्षकांना लेक्चर देतांना बी. के. स्वामीनाथन भाई.



**गडचिरोली :** व्यसनमुक्ती कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल बी. के. डॉ. सचिन परब व बी. के. नलिनी बहेन यांना सर्टिफिकेट देतांना जि.प.अध्यक्ष मा. आत्रम.



**अहमदनगर :** नारी सशक्तिकरण कार्यक्रमात भाषण करतांना महापौर शीला शिंदे, मंचासीन बी. के. राजश्री बहेन व अन्य.



**उद्‌गीर :** महाशिवरात्री महोत्सवाचे उद्‌घाटन करतांना विधायक सुधाकर भालेराव, भा.ज.पा. प्रदेश उपाध्यक्ष भ्राता रामचंद्र तिरुके, ब्र. कु. महानंदा दीदी व ब्र. कु. छाया बहेन.



**संगमनेर (ताजणेमळा) :** 'एक शाम प्रभू के नाम' या कार्यक्रमाला उपस्थित नगराध्यक्ष भ्राता दिलीप पुंड यांचा सत्कार करतांना बी. के. अनिता बहेन.



**कामठी :** पॉझिटीव्ह पर्सनालिटी या विषयक कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना बी. के. राधा बहेन, फाल्गुनी बहेन व प्रेमलता बहेन तसेच श्री. हुकुमचंद आमधरे, श्री. साबळे व श्री. डोनेकर.



**भिवंडी (पीसपार्क) :** शिव ध्वजारोहण करतांना नगरसेवक कमलाकर पाटील, सहआयुक्त श्री. माने, भ्राता लक्ष्मण शेठ व बी. के. शिल्पा बहेन.



**मलकापूर :** महाशिवरात्रीच्या प्रसंगी दिप प्रज्ज्वलनानंतर उभ्या आहेत नगराध्यक्षा शोभा मिरजकर, विरोधी पक्षनेते सुधाकर पाटील, बी. के. वंदना बहेन व अन्य मान्यवर.




**वसई रोड :** महापौर भ्राता नारायण मानकर यांच्या हस्ते झांकीचे उद्घाटन करतांना सोबत नगरसेवक पालांडे, डॉ. प्रियंका, ब्र. कु. केशवभाई, ब्र. कु. भारती व ब्र. कु. प्रफुल्ला बहेन.



**उल्हासनगर (नं. ५) :** शिवदर्शन प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना समाजसेवक गुरु वलेशा व मीना सोंडे सोबत बी. के. सुनिता बहेन व देवी बहन.



**कडेगाव (सांगली) :** महिला सुरक्षा अभियान शोभायात्रेत चैतन्य देवीच्या झांकीचे उद्घाटन करतांना साखर कारखान्याचे चेअरमन श्री. मोहनराव कदम, सोबत बी. के. सुनिता बहेन व मीना बहेन.



**मालवण (राठीवडे) :** येथे शिवध्वजारोहण केल्यानंतर ग्रुप फोटोत जि.प. अध्यक्षा शोभा पांचाळ, सरपंच आबा धुरी व बी. के. वर्षा बहेन.




**मालेगाव (सटाणा) :** महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करतांना पोलिस निरीक्षक प्रज्ञा झेडगे, शेजारी डॉ. सर्जन किरण अहीरे, नगरसेविका सुमन सोनवणे व ब्र. कु. अंजु बहेन.



**कुर्डुवाडी :** महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करतांना बी. के. मीरा बहेन, मंचासीन नगराध्यक्षा शुभांगी श्रीरामे, डॉ. नागश्री दोशी, रंजनी बहेन, माजी आमदार श्री. पाटील, बी. के. शिवकन्या बहेन व अन्य मान्यवर.



**नशिराबाद :** महाशिवरात्रीचे अध्यात्मिक रहस्य समजावून सांगतांना बी.के. मंगला बहेन, मंचासीन सरपंच बिकास पाटील, ह.भ.प. सुरेश महाराज, डॉ. सोनाली नारखेडे, बी. के. दीपा बहेन व गणपत भाई.



**हिंगोली :** महाशिवरात्रीनिमित्त सद्‌भावना रॅली चे उद्‌घाटन करतांना माजी खासदार ॲड. माने, नगराध्यक्ष श्री. गणेश लुगे, श्री. संदेश देशमुख, श्री. जाधव, नगरसेविका बसंताबाई लुगे, बी. के. अरुणा बहेन व गीता बहेन.



**खेड (रत्नागिरी) :** येथील रोटरी क्लबतर्फे संचालिका बी. के. गीता बहेनजी यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह प्रदान करुन सत्कार करतांना रोटरी क्लबचे डॉ. जॉन्सन फर्नांडीस.



**पुणे (येरवडा) :** आमदार श्री. बापूसाहेब पठारे यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना राजयोगिनी उर्मिला दीदी तसेच आभार प्रदर्शन करतांना बी. के. प्रयागा बहेन.



**बार्शी :** शिवध्वजारोहणानंतर शिवस्मृतीत उभ्या आहेत बी. के. संगीता बहेन, महादेवी बहेन तसेच लायन्स क्लब सेक्रेटरी अशोक श्रीमाळ, प्रसिद्ध व्यापारी जयप्रकाश माडेकर, श्री. ओमप्रकाश बाफणा, डॉ. हेमंत साने, लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. धारुरकर, कृषिअधिकारी श्री. कदम व अन्य.



**जालना :** 'अलविदा डायबिटीज' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना सुप्रसिद्ध उद्योजक रमेशभाई पाटील, संपादक शिबरतन मुंदडा, मर्चंट बँकेचे अध्यक्ष श्री. अग्रवाल, ब्र. कु. सुलभा दीदी व डॉ. सुरेश मणियार.



**नांदगाव :** महाशिवरात्री महोत्सवात दीप प्रज्ज्वलन करतांना तहसिलदार श्री. सुदाम महाजन, नगराध्यक्षा शकुंतला कवडे, पं.स. सभापती श्री. जाधव, बी. के. नरेंद्र भाई व बी. के. कमलबहेन.




















**१. मा.आबू (ज्ञानसरोवर) :** वैज्ञानिक व इंजिनियर्स यांच्या संमेलनाचे उद्घाटन करताना राजस्थानचे उपसभापती श्री. रामनारायण, बी. के. सरला दीदी, बी. के. निर्वैर भाई, डॉ. निर्मला दीदी व बी. के. मोहन सिंघल. **२. मालेगाव :** आमदार श्री. भुसे यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र. कु. सुधा दीदी व मंगला बहेन. **३. सावदा (बुरहानपूर) :** महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते श्री. एकनाथ खडसे यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र. कु. मंगला दीदी सोबत वैशाली बहेन. **४. सायन (मुंबई) :** महिलांसाठी आयोजित हळदी-कुंकु कार्यक्रमात राजयोगिनी संतोष दीदी यांचा सन्मान करतांना रश्मी ठाकरे. **५. बोरिवली (मुंबई) :** बारा ज्योतिर्लिंग झांकीचे उद्घाटन करतांना आमदार गोपाळ शेट्टी, खासदार संजय निरूपम, नगरसेवक शिवा शेट्टी, बी. के. बिंदू बहेन व डॉ. शेट्टी. **६. अमरावती :** येथील कार्यक्रमात भाषण करतांना पो. आयुक्त अजित पाटील, मंचासीन अभिनेत्री नवनीत कौर, राजयोगिनी उषा दीदी, बी. के. सीता दीदी व संगम बहेन. **७. चिंचवड (पुणे) :** १५ फुटी शिवलिंग व १०८ शालिग्रामच्या झांकीचे उद्घाटन करतांना महापौर सौ. मोहिनी लांडे, बी. के. अश्विनी व करूणा बहेन तसेच मान्यवर नगरसेवक. **८. चंद्रपूर :** व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना पर्यावरण मंत्री श्री. संजय देवताळे, जि.प.अध्यक्ष संतोष कुंभारे, डॉ. सचिन परब, ब्र. कु. कुसुम बहेन, नलिनी बहेन व नंदा बहेन.

Registration No. 033000/30/AL/85/NT/11

**सोनई :** देश-विदेशातील ७७ प्रकारच्या फुलांचा हार शिवलिंगावर अर्पित करण्यात आला. या हाराचा समावेश 'वर्ल्ड अमेझिंग रेकॉर्ड' मध्ये झाल्याने त्याचे प्रमाणपत्र बी. के. उषा व बी. के. दीपक यांना देतांना श्री. पवन सोळंकी.



**वाशी (नवी मुंबई) :** येथील कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना बी. के. शिवानी बहेन, भ्राता सुरेश ओबेरॉय, महापौर सागर नाईक, ब्र. कु. शीला व तारा बहेन, नगरसेविका शिल्पा मोरे, ब्र. कु. गंगाधर व अन्य.




**बोरिवली (प्रभु उपवन) :** येथे डॉक्टर्ससाठी आयोजित कार्यक्रमात (Rejuvenating Mind Power) भाषण करतांना बी. के. कविता, मंचासीन डॉ. अशोक मेहता, डॉ. श्रीखंडे, डॉ. गुप्ता, बी. के. दिव्या बहेन, बी. के. बिंदू बहेन व डॉ. गिरीश पटेल.



**अहमदनगर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री. राज ठाकरे यांना ईश्वरी संदेश देतांना बी. के. दीपक.